

पालकनीती

▼ मार्च २०२३ (मासिक) ▼ किंमत ₹ २५
▼ PUNE, वर्ष २२ ▼ अंक १२ ▼ पृष्ठे २०

पालकत्वाला
वाहिलेले
मासिक







निमित्त प्रसंगाचे

वेदिका यंदा सातवीत शिकते. त्या दिवशी आरशासमोर उभी राहून केस विंचरत होती. सोबतच गाणं गुणगुणणंही सुरू होतं. ‘‘मेरे ख्वाबोमें जो आए...’’

तिला आपल्या सिल्की केसांचा फार अभिमान होता. तिच्या केसांचा सगळ्यांना हेवा वाटायचा. एकदा उंच बो बांधून पाहिला. मग केस मोकळे सोडून पाहिले. तिरकं बघून, केस मागे पुढे करून स्वतःला आरशात निरखून झालं. कसं मस्त वाटत होतं.

भाजी निवडता निवडता आई तिच्याकडे बघत होती. किती पटकन मोठी झाली ही. अगदी कालपरवापर्यंत माझ्यासमोर बसे; वेणी घालून दे म्हणून. आता मुळीच दाद देत नाही पोरगी. कपडे, केस, मित्रमैत्रिणी... तिच्याच जगात असते. जरा म्हणून घरात लक्ष नसतं. नाही म्हणायला सांगितलेली कामं करते; पण फक्त उरकायची म्हणून... स्वतःहून, जबाबदारी घेऊन काही करेल तर शपथ.

शेवटी न राहवून आईनं टोकलंच.

‘‘वेदू, कुठे चाललीस ग अशी नटूनथटून?’’

‘‘कुठेच नाही, खाली खेळायला चाललीये. आणि नटूनथटून कुठे? केसच तर विंचरतीये,’’ वेदिका.

‘‘कोणासोबत खेळायला?’’

‘‘नेहमीचेच. रमा, सई, अभि, यश... का ग?’’

‘‘काही नाही, खालच्या काकू सांगत होत्या, की तुम्ही नुसत्या गुलुगुलु गप्पा मारत बसता.’’

‘‘ईऽऽऽ! गुलुगुलु काय शब्द आहे? गिळगिळीत... अग, खेळून झालं, की मारतो थोड्या गप्पा. त्यात काय एवढं?’’

‘‘नाही! खेळायला नाही जायचं आता. मला जरा मदत कर. मोठी झालीस आता तू.’’

‘‘केली ना ग मदत. झाडून काढलं. कपडे आवरले.’’

‘‘स्वयंपाकात मदत कर मला.’’

‘‘दादा कसा गेला खेळायला? त्याला सांगते का तू कामं?’’

‘‘खूप बोलतेस हं तू आजकाल. आत्ताच इतकं उलटं बोलतीयेस, तर कॉलेजात गेल्यावर तर डोक्यावरच बसशील. खूपच शहाणी झाली नाही का? लोक काय म्हणतील?’’

‘‘तू का लोकांचा विचार करतेस? आणि डोक्यावर कशाला बसेन?’’ हसू दाबत वेदिका म्हणाली.

‘‘बाई बाई! तुझ्याएवढी असताना मी माझ्या आईवडिलांशी किती अदबीनं वागायचे. तुझ्यासारखं उलटं नव्हते बोलत. चांगलीच शिंगं फुटलीयेत ग तुला.’’ आईची चिडचिड वाढत चालली.

‘‘दे एक दणका तिला. फारच झालंय. किती वेळ आरशासमोर तयार होते. गाणं काय म्हणते. बाहेर मुलांसोबत काय खेळते. शोभतं का मुलीच्या जातीला?’’ बाबा.

‘‘शीऽऽऽ. कसा विचार करता तुम्ही? मी चालले खेळायला,’’ म्हणत तणतणत वेदिका निघाली तसा तिला पाठीत एक दणका बसला...

१. वेदिकाने कसे वागावे असे आईबाबांना वाटतेय?

२. या प्रसंगातील वेदिकाचे कोणते वागणे आईबाबांना आवडत नाहीये? त्यामागे त्यांचा काय विचार आहे?

३. या प्रसंगातील संघर्षाचे मूळ कारण काय आहे?

४. पालक आणि मूल ह्यांच्यात मतभेदच नाहीत असे शक्य आहे का? या मतभेदांना कसे हाताळावे? तुमची पद्धत काय असते?

५. अशा वेळी ‘मार’ हा उपाय असू शकेल का? मुलांनी नेहमी आपल्या धाकात असावे हे योग्य आहे का?

आनंदी हेर्लेकर
h.anandi@gmail.com

याअंकात

‘जडणघडण छोट्यांची जबाबदारी मोठ्यांची’ या लेखमालेतील पुढचा लेख तसेच वैशाली गेडाम यांचा त्यांच्या अनुभवांवर आधारित लेख या अंकात पृष्ठसंख्येच्या मर्यादेत सामावून घेऊ शकलो नाही. पुढील महिन्यात हे लेख आपल्या भेटीला येतील...

पालकनीती
पालकत्वाला वाहिलेले मासिक

संपादक
संजीवनी कुलकर्णी

कार्यकारी संपादक
अनघा जलतारे

ह्या अंकाचे संपादन
कृणाल
शुभदा जोशी

मुखपृष्ठ व अंकमांडणी
रमाकांत धनोकर

अक्षरजुळणी
लक्ष्मण व्यवहारे

वार्षिक वर्गणी
₹ ३००
(जोड अंकासहित)
वर्गणी ऑनलाईन / रोख / चेक / ड्राफ्टने भरता येईल

संपर्क :
पालकनीती परिवार,
अमृता क्लिनिक,
संभाजीपूल कोपरा,
कर्वे रस्ता, पुणे ४११००४
फोन : ८०८७०१५७२६
९८३४४१७५८३ (अनघा)
९८२२००१४७७ (संजीवनी)
palakneeti@gmail.com
www.palakneeti.in

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष २२ - अंक १२
मार्च २०२३

संवादकीय

पुन्हा एकदा वर्षातले 'ते' दिवस आलेत. समाजमाध्यमे गुलाबी रंगाने झळाळून उठली आहेत, स्त्रियांशी सन्मानाने वागण्याची आठवण करून दिली जाते आहे, प्रसारमाध्यमे महिलांच्या विविध क्षेत्रातील कामगिरीचे प्रदर्शन मांडत आहेत, 'स्त्रियांशी कसे वागले पाहिजे' ह्यासारख्या संदेशांनी आपले 'इनबॉक्सेस' तुडुंब भरून वाहताहेत, ही दरवर्षी येणारी एक लाट असते आणि आहे.

संयुक्त राष्ट्रांनी (UN) नुकतीच स्त्रियांच्या जीवनमानाविषयी काही माहिती प्रसृत केली. त्यानुसार संपूर्ण लिंग-समानता यायला सध्याच्या प्रगतीच्या दराने आणखी ३०० वर्षे जावी लागतील. कुणी म्हणेल ३०० वर्षे कशासाठी लागताहेत? ही जरा अतिशयोक्ती होत नाहीय का? हा अंक ऊसतोडणी कामगारांच्या प्रश्नाबद्दल आहे, त्यातील महिलांची स्थिती पाहिली तरी या बोचऱ्या वास्तवाची जाणीव होऊ शकेल.

१४६ देशांच्या क्रमवारीत जागतिक लिंग असमानता निर्देशांकात भारताचे स्थान १३५ वे आहे. स्त्रियांचा 'आर्थिक सहभाग आणि संधी' ह्या विभागात आपण १४३ वा क्रमांक पटकावला आहे. आपल्या मागे फक्त ३ देश आहेत; इराण, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान. आणि 'आरोग्य आणि अस्तित्वा'च्या श्रेणीत आपण शेवटून पहिला नंबर कमावला आहे, हे कळले तर आश्चर्य वाटायला नको. आपली कृती, आपले वागणे-बोलणे कधी उघडउघड तर कधी आपल्याही नकळत पितृसत्तेला, लिंगसापेक्ष भूमिकांना आणि असमानतेला बळकटी देत असते. हे फक्त घरातल्यापुरतेच मर्यादित नाही, तर समाजातही हेच चित्र पाहायला मिळते.

जरा थांबा. हे सगळे सांगण्यामागे 'भारतात किंवा जगभरात कसे काहीच घडलेले नाही' हे सांगण्याचा उद्देश नाही. जगात असेही देश आहेत, जिथे लिंग असमानता १० टक्क्यांहूनही खाली आलेली आहे. आपल्या आजूबाजूच्या पारंपरिक भूमिकांमध्ये लक्षणीय बदल झालेला दिसून येतो आहे; हेही मान्य आहे. मात्र एक समाज म्हणून, एक देश म्हणून आपल्याला अजून बरीच मोठी वाटचाल करावी लागणार आहे, असे म्हणणे हा देशद्रोह नाही. व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या लोकांच्या हेतूंवर शंका घेणे, त्यांची बदनामी करणे असे प्रकार हल्ली वाढलेले दिसत आहेत. असे करण्याने इतर ज्वलंत प्रश्नांवरून लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवणे शक्य होत असेलही; परंतु पुढील काळात ह्याचा आपल्या सगळ्यांना फटका बसल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे अशा प्रकारांमध्ये आपण कळत-नकळत सामील होत नाही आहोत ना, ह्यासाठी जागरूक राहायला हवे.

मागील साखर हंगामात भारत जगातील सर्वात मोठा साखर-उत्पादक आणि ग्राहक ठरला. आणि दुसऱ्या क्रमांकाचा साखरेचा निर्यातदारही. भारताला सर्वात मोठा 'साखरेचे खाणारा देश' बनवण्यात आपण सगळ्यांनीच हातभार लावलेला आहे. आणि अप्रत्यक्षपणे का होईना, उसाचे उत्पादन वाढवण्याचा रेटाही लावलाय. भारतात ऊस-उत्पादनात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. ह्यातील बराचसा ऊस मराठवाड्यातील दुष्काळप्रवण भागात घेतला जातो. उसाची वाढती मागणी म्हणजे अधिकाधिक जमीन उसाखाली येणे. त्याचे जमिनीवर होणारे परिणाम आपण जाणतोच. उसाला खूप जास्त पाणी लागते. १ किलो साखरेच्या उत्पादनाला २५१५ लिटर पाणी लागते. याखेरीज त्यामध्ये ऊसतोड मजुरांचे अधिकाधिक शोषण, अधिकाधिक बालिका लग्नाकडे ढकलल्या जाणे, ऊसतोडणी करताना मासिक पाळीचा अडथळा येऊन कामाचा खण्पा होऊ नये म्हणून आणखी स्त्रियांनी आपले गर्भाशय काढून टाकणे आणि आणखी अनेक मुलांना शिक्षणाच्या संधीं नाकारल्या जाऊन हाती कोयता धरावा लागणे, या परिणामांकडे पाठ फिरवून कसे चालेल?

आपण खात असलेल्या साखरेची किंमत नेमकी कोण चुकवतोय? एक उपभोक्ता म्हणून आपण ह्यापेक्षा अधिक संवेदनशीलपणे आणि जबाबदारीने वागू शकतो का? आपल्या आवडीनिवडी समाजातल्या विषमतेत भर घालतात, ह्याची आपल्याला जाणीव आहे का, ह्याची आठवण हा अंक आपल्याला करून देईल.

ह्या वर्षीच्या महिला दिनी आपल्याला मेसेजेस, फुले, 'गिफ्ट्स' अशा वरवरच्या 'सेलिब्रेशन' पलीकडे जाऊन स्वतःच्या मनाशी काही संकल्प करता येतील का? परिपूर्तीसाठी काही कृती सुचवता येतील. आपण वापरत असलेल्या वस्तूंची सजगपणे निवड करणे, बोलताना वापरण्याची भाषा, शब्दांचा वापर जाणीवपूर्वक करणे; केवळ काही विशिष्ट दिवशीच नव्हे, तर वेळोवेळी घरी, समाजात, कामाच्या ठिकाणी स्त्रियांची, त्यांच्या योगदानाची दखल घेत राहणे, इत्यादी. खरे सांगायचे तर सर्वांप्रति समानतेची आणि सन्मानाची भावना आपल्या मनात सदैव जागी असेल तर कृती आपोआप घडतील.

विषय–ओळख

ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नाबद्दल या अंकात मांडणी केलेली आहे.

या मुलांबरोबर काम करणाऱ्या ‘विद्योदय’ आणि ‘ग्रामऊर्जा’ या दोन संस्थांसमवेत काम करण्याची गेल्या वर्षात संधी मिळाली. ह्या मुलांच्या संदर्भातले वास्तव भयंकर आहे. प्रश्न मोठा गंभीर आणि व्यामिश्र आहे. या संदर्भात शासन आणि सामाजिक संस्थांकडून केले जाणारे प्रयत्न अत्यंत अपुरे आहेत. त्यामुळे या प्रश्नाची व्याप्ती फारशी कमी होत नाही.

पालकनीतीच्या वाचकांसाठी हा मुद्दा थेट सामोरा येत नाही. तरीही आपल्या आजूबाजूला लाखांच्या संख्येत अशी मुले आहेत, ज्यांना वर्षातून चार महिनेच शाळेत जाणे शक्य होते. पालकांच्या हंगामी स्थलांतराच्या कामात या मुलांना अनेकदा शाळा सोडावी लागते आणि आईवडिलांच्या सोबत कष्टाच्या चाकोरीत अडकणे भाग पडते.

या प्रश्नांवर काम करणाऱ्या काही कार्यकर्त्यांच्या नजरेतून अंकाची मांडणी केलेली आहे. खरे तर वीस पानी अंकात ही मांडणी करणे अवघड आहे. या प्रश्नाची आणि उत्तरांच्या संभाव्य दिशांची किमान उकल वाचकांना व्हावी अशी आशा आहे.

मुखपृष्ठाविषयी...

मुखपृष्ठावरील प्रमुख छायाचित्रात सीता पानवर या बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार आपली तीन मुले रवी, रेणुका आणि मंगल यांच्यासह.

छायाचित्रकार – सायमन टाऊन्स्ली

सौजन्य – ‘द टेलिग्राफ’

हे छायाचित्र ज्या लेखात आहे तो संपूर्ण लेख आपण https://www.telegraph.co.uk/global-health/women-and-girls/sterilisation-in-india/ येथे वाचू शकता.

मुखपृष्ठावरील इतर छायाचित्रे विद्योदय आणि ग्रामऊर्जा या संस्थांच्या सौजन्याने.

गाता साखरेची गाणी, पोरांच्या डोळा पाणी

परेश जयश्री मनोहर

अनिल एक नऊ वर्षांचा मुलगा. जानेवारीच्या थंडीत त्याचा अंगठा तुटला. अशा वेळी त्याला उपचार मिळायला हवेत. खरे तर त्याने शाळेत असायला हवे होते; पण तो शेतात ऊसतोडीचे काम करतोय. हे शेतात काम करायचे वय नाहीच. अनिल अशा लाखो मुलांपैकी एक आहे, जी दरवर्षी सहा ते सात महिन्यांसाठी आपल्या पालकांसोबत स्थलांतर करतात. आपले गाव सोडून पोटापाण्यासाठी महाराष्ट्रातल्याच साखरपट्टयात ऊसतोडणी करण्यासाठी!

खरे तर या मुलांना खेळायचे असते, मस्ती करायची असते. यांनाही दप्तर घेऊन शाळेत जायचे असते, खूप शिकायचे असते; पण ही असतात शेतात. कधी ऊस तोडतात, कधी आसपासच्या हॉटेलमध्ये मिळेल ते काम करतात, कधी आपल्या भावंडांना सांभाळतात, तर कधी सोबत आणलेल्या गायी, म्हशी, बकऱ्या, कोंबड्यांची काळजी घेतात. आणि काहीच नसेल तर भटकत असतात रस्त्यांवर आपल्या जगण्याचा हिशेब मांडत!

शाळेत तर जायचे आहे पण न दप्तर, न वह्यापुस्तके, न पायात घालायला चपला, न शाळेचा गणवेश, न कोणी शाळेत सोडणारे. शिकणे एवढी सोपी गोष्ट असते का? असेलही कदाचित इतरांसाठी शाळेत जाणे आणि शिकणे सोप्पे; पण ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी ही एक मोठी लढाई असते. ही मुले आपल्या अवतीभोवती असतात पण आपल्याला दिसत नाहीत. त्यांचे असे बालपणीच मोठे होणे आपल्याला जाणवत नाही. ही लाखो मुले दरवर्षी आपली शाळा, आपले गाव सोडून कुठे जातात? का? कशासाठी? जिकडे जातात तिकडे त्यांना शाळा मिळत असेल का? तिकडे त्यांची काळजी घेणारे कोणी असेल का? हे प्रश्न आपल्यालाही पडत नाहीत आणि आपल्या व्यवस्थेलाही! या मुलांची कुठलीही माहिती कुठल्याच विभागाकडे मिळत नाही. आपल्या रोजच्या जगण्यात आपल्याला या प्रश्नांकडे बघायला वेळही नसतो. कदाचित या प्रश्नांकडे बघण्याची नजर आपल्याला अजून कमवायचीही असेल.

रोज जगताना ज्या गोष्टी आपण अगदी सहजपणे वापरतो, त्यांच्या उत्पादनात अनेकदा अशा गोष्टी दडलेल्या असतात ज्यांची आपल्याला कल्पनाही नसते. अगदी साधे सांगायचे, तर आपण जे कपडे वापरतो त्याचा कापूस वेचण्यासाठी हजारो मुले बालमजूर म्हणून काम करत असतात. दिवाळीत जे फटाके फोडून आपण आनंद मिळवतो, ते तयार करताना हजारो लहान मुलांच्या हातांची आणि आयुष्याची माती होत असते. असेच रोजच्या आयुष्यातले साधे उदाहरण म्हणजे साखर! त्यासाठी लागणारा ऊस तोडण्यामध्ये कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणे लहान मुले गुंतलेली



असतात. या ऊसतोड-कामगारांच्या मुलांच्या प्रश्नांची ओळख करून घेऊयात.

आपल्या देशभरात साधारणपणे चारशे साखर कारखाने आहेत. त्यातले जवळपास दोनशे साखर कारखाने एकट्या महाराष्ट्रातच आहेत. त्यापैकी दीड-पावणेदोनशे कारखाने दरवर्षी सुरू असतात. प्रामुख्याने नाशिक ते कोल्हापूर या पश्चिम महाराष्ट्रातील भागात हे कारखाने आहेत. हा भाग साखरपट्टा म्हटला जातो. मात्र ऊसतोडणीसाठी लागणारे मजूर इथले नसतात; ते येतात मुख्यतः बीड, जालना, परभणी अशा मराठवाड्यातील जिल्ह्यांमधून! हा भाग नंदुरबार ते नांदेड असा पंधरा-सोळा जिल्ह्यांमध्ये पसरलेला आहे. दरवर्षी किमान दहा ते बारा लाख कामगार ऊसतोडणीसाठी हंगामी स्थलांतर करतात. ज्या भागातून हे स्थलांतर होते, तिथे पावसावर अवलंबून असणारी शेती, पर्यायी रोजगाराची साधने नसणे, औद्योगिक क्षेत्रांची वानवा अशा अनेक कारणांमुळे लोकांना बारमाही रोजगार उपलब्ध नसतो. त्यामुळे ते ऊसतोडणीच्या कामाकडे वळतात. ऑक्टोबर महिन्यानंतर या जिल्ह्यांतील शेकडो गावांमध्ये म्हातारी माणसे आणि काही मुले याशिवाय कोणीही दिसत नाहीत. साखर हंगाम साधारणपणे ऑक्टोबर ते एप्रिल असा सहा ते सात महिन्यांचा असतो. या काळात साखर कारखान्यांच्या गावात आणि परिसरात तळ टाकून परिसरातील ऊस तोडण्याचे काम ही मजूर मंडळी करत असतात. या मजुरांसोबत त्यांची लहान मुलेही स्थलांतर करतात. दरवर्षी एक ते दीड लाख लहान मुले आपल्या पालकांसोबत स्थलांतर करतात. गेल्या अनेक पिढ्या हे हंगामी स्थलांतर चालू आहे.

स्थलांतरितांचे वेतन, रोजगार, सुरक्षा, आरोग्यसुविधा इत्यादी महत्त्वाच्या प्रश्नांसोबतच आणखी एक प्रश्न आहे तो त्यांच्या मुलांच्या सुरक्षेचा, जगण्याच्या मूलभूत अधिकारांचा आणि शिक्षणाचा! संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्याख्येप्रमाणे १८ वर्षे वयापर्यंतची प्रत्येक व्यक्ती मूल समजली जाते. भारतात अनेक वेगवेगळ्या कायद्यांमध्ये आपण मुलांची वर्गवारी केलेली आहे. बालकामगारविरोधी कायद्यांमध्ये आपण १४ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी कामावर संपूर्ण निर्बंध आणले आहेत, तर गेल्या काही वर्षांत जेजे ॲक्ट अंतर्गत बाल लैंगिक गुन्ह्यांमध्ये मुलांचे वय १६ पर्यंत निर्धारित करण्यात आले आहे. आपल्या संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असलेला शिक्षणाचा मूलभूत हक्क देणारा शिक्षणहक्क कायदा मुलांची वयोमर्यादा ६ ते १४ अशी निर्धारित करतो. पण मग हे सगळे कायदे असताना ही मुले अजूनही माणूस म्हणून जगू का शकत नाहीत? नीट पोषणमूल्ये असलेले जेवण, सुरक्षित निवारा, चांगले शिक्षण, समाजात सन्मानाची वागणूक अशा मूलभूत गोष्टींपासून ही मुले दूर का आहेत? ती शिकू का शकत नाहीत?

या स्थलांतरित मुलांचे प्रश्न समजून घेण्यासाठी टाटा ट्रस्टने 'डिजिटल एज्युकेशन गॅरंटीकार्ड'-आशा हा प्रकल्प २०१६ ते २१ या काळात चालवला. शालेय शिक्षण विभाग आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प सुरू झाला. प्रामुख्याने स्थलांतरित ऊसतोडणी कामगारांची मुले शाळेत नियमित करायची असतील तर काय काय करायला हवे, याचा संशोधन-अभ्यासप्रकल्प असे या कामाचे स्वरूप होते. जनसेवा ग्रामीण विकास व शिक्षण प्रतिष्ठान ही संस्था अंमलबजावणी संस्था म्हणून प्रकल्पात काम करत होती. प्रकल्पक्षेत्र म्हणून पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखाना निवडला गेला. या परिसरातील गावे आणि कारखानातळावर आलेल्या सगळ्या कामगारांचे सर्वेक्षण केले गेले. ० ते १८ वयोगटातील मुलांचे वेगळे सर्वेक्षण करण्यात आले. त्यातील ६ ते १४ या वयोगटातील मुलांना परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळेत आणि खाजगी अनुदानित शाळांमध्ये नियमित करण्याचे प्रयत्न करणे हा कामाचा मुख्य भाग होता. या प्रकल्पासाठी ३५ गावे, कार्यकर्ते, समन्वयक, प्रकल्प व्यवस्थापक, संचालक, समुपदेशक आणि कार्यालयीन कर्मचारी अशी ४५ लोकांची टीम निवडण्यात आली. शालेय विभागाच्या वतीने एक शिक्षकही शिक्षक-संवादक म्हणून देण्यात आला.

६ ते १४ वयाच्या सगळ्या मुलांचे विस्तृत सर्वेक्षण करण्यात आले. ही मुले आधी शाळेत जात होती का? शाळा कोणती? शाळेत जात नसल्यास शाळा सोडण्याची कारणे, शाळा कधी सोडली ह्याचा तपशील इत्यादी गोष्टींच्या नोंदी घेण्यात आल्या. त्यानंतर परिसरातील सगळ्या शाळांसोबत बैठका घेऊन या मुलांना शाळाप्रवेश देण्याविषयी तयारी करण्यात आली. साधारण ४८०० मुलांपैकी ३६०० मुलांना शाळेत दाखल करण्यात यश आले होते. अर्थात, त्यातील अनेक मुले अनियमितपणे शाळेत गेलेली होती. गाव

कार्यकर्ता/कर्तीने रोज तळावर जाऊन सगळ्या मुलांमुलींना आपल्यासोबत शाळेत घेऊन जाणे आणि संध्याकाळी परत कोप्यांवर (मुलांची तात्पुरती घरे) घेऊन येणे हा त्यांच्या जबाबदारीचा भाग होता. शाळेत येऊ शकणाऱ्या आणि येऊ न शकणाऱ्या सगळ्या मुलांमुलींची तसेच त्यांच्या येऊ न शकण्याच्या कारणांची रोज नोंद घेण्यात आली. यामुळे मुले शाळेत न येऊ शकण्याच्या कारणांची वारंवारिता लक्षात घेता आली. रोज संध्याकाळी कोपीवर पुस्तकवाचन आणि खेळ घेतले जायचे. यातून मुलांसोबत जैव नाते तयार करण्यावर कार्यकर्त्यांचा भर होता.

या पाच वर्षांच्या कामातून स्थलांतरित मुलांच्या शिक्षणातले नेमके प्रश्न कोणते याचा अभ्यास करताना काही महत्त्वाच्या बाबी जाणवल्या, त्या पुढीलप्रमाणे –

१. या मुलांच्या शिक्षणातील एक मोठाच अडथळा म्हणजे त्यांच्या मनावर येणारे दडपण! साधारण स्थिरस्थावर घरातील मुले आणि पालक दोघांनाही रोज एकाच अवकाशात (तेच गाव, शाळा, शेत, रोजची ओळखीची माणसे इ.) वावरायची सवय असते. त्यातच त्यांचा ‘कम्फर्ट झोन’पण तयार झालेला असतो. ज्या क्षणी ऊसतोडणी कामगार आणि त्यांचे कुटुंब आपले घर सोडते, त्या क्षणीच त्यांचे हे कवच गळून पडते. त्यांचे नाव, गाव, सगळी ओळख नष्ट होऊन ‘नगरी’ ही एकच एक ओळख मिळते. पूर्वी अहमदनगर जिल्ह्यातील काही तालुक्यांतून ऊसतोडणी कामगार येत, म्हणून हे ‘नगरी’ संबोधन सगळ्याच ऊसतोडणी कामगारांसाठी वापरले जाते. तर हे सगळे नगरी! बायका, मुले आणि पुरुष; सगळेच नगरी! स्वत:ची संपूर्ण ओळख बाजूला ठेवणे हा पहिला ताण!

२. ट्रक आणि ट्रॅक्टरसोबत काम करणाऱ्या कामगारांना साधारणत: १५ ते २० दिवसात गाव बदलावे लागते, टोळ्या वेगवेगळ्या गावांत पाठवल्या जातात. दर १५ दिवसांनी नवे गाव, नवे लोक आणि कोणाशीही कसलेही संबंध नसलेली टोळीची राहायची जागा! आधी ज्या तळावर राहताहेत तिथे जमू लागलेले मित्रमैत्रिणी अचानक सोडून जायचे, कुठे जायचे आहे, सोबत कोण असेल हे माहिती नाही या सगळ्याचा त्यांच्यावर भयंकर ताण असतो. मोठी माणसे आपापल्या अनुभवांच्या जोरावर निभावून नेतात; पण लहान मुलांना मात्र ह्या सगळ्याशी जुळवून घेणे कठीण जाते.

३. पहाटे चार-साडेचार वाजता उठून पालक ऊसतोडणीसाठी जातात तेव्हा आपली लहान मुले मागे ठेवून जाण्याची त्यांना भीती वाटत असते. अनेकदा हे तळ गावापासून लांब असतात. तिथे विजेची सोय नसते. जवळपास पाण्याची सोय बघून तळ टाकतात, त्यामुळे बरेच वेळा कॅनॉलच्या आसपास तळ पडलेले असतात. अशात अपघातांची शक्यता असते. शाळेची वेळ दुपारची असते; त्यावेळी मुले पालकांबरोबर कामावर गेलेली असतात.

४. मूल साधारण तीन वर्षांचे होईपर्यंत त्याला अत्यंत निगुतीने वाढवण्यावर प्रत्येक कुटुंबाचा कटाक्ष असतो. परंतु ऊसतोडणी कामगारांच्या आयुष्यात अशी काळजी करण्याची सुखसुविधा नसते. फडात मिळेल तिथे सावली बघून जुन्या साडीची झोळी करून त्यात बाळाला झोपवणे आणि रडून गोंधळ घातला की बघून येणे यापेक्षा जास्त काहीही करण्याची सवड आई आणि बाबाला नसते. जराशी मोठी उठतीबसती बाळे उसाच्या पाचटात आपापली खेळत बसतात. कधी सर्पदंश किंवा ट्रॅक्टरखाली येणे अशा अपघातांना बळी पडू शकतात.

५. जरा मोठ्या मुलांवर अनेक प्रकारची जबाबदारी असते. वय वर्षे बाराच्या पुढील मुलांवर पालकांनी उचल घेतलेली असते; म्हणजे या मुलांनी सहा महिने काम करावे यासाठी मुकादमाकडून आधीच पैसे उचललेले असतात. या मुलांना ऊसतोडणीचे काम करावे लागते. इतर मुले लहान भावंडांना सांभाळणे, स्वयंपाक करणे, जनावरांची काळजी घेणे, घराची राखण करणे, पिण्याचे पाणी भरणे, भांडी, कपडे, झाडलोट अशा प्रकारच्या कामांमध्ये अडकलेली असतात. ही सगळीच कामे त्या कुटुंबांचे रोजचे व्यवहार सुरळीतपणे चालण्यासाठी गरजेची असतात. मुलांना लहान वयातच पालकांची अडचण लक्षात घेऊन कामाला लागावे लागते.

६. शिकण्याच्या क्षमतांवर परिणाम करणारी महत्त्वाची बाब म्हणजे पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणातील सातत्याचा अभाव! सहा महिने गावात अंगणवाडी आणि बाहेर पडल्यावर काहीच नाही या व्यवस्थेत मुले वाढत असल्याने सलग पूर्व-प्राथमिक शिक्षण मिळत नाही. यामुळे मूलभूत वाचन-लेखनकौशल्येही या मुलांमध्ये आढळत नाहीत. लिहिता-वाचता येत नसताना शाळेत बसून तरी काय करणार



हा प्रश्न मुलांना पडतो. शाळेत काहीच येत नसल्याने होणारी मानहानी, ढासळत जाणारा आत्मसन्मान या प्रश्नात मुले अडकतात आणि शाळेत न जाणेच पसंत करतात.

७. राहत्या जागी, विशेषत: मुलींवर, होऊ शकणाऱ्या शारीरिक अत्याचारांच्या शक्यता हा एक मोठा भाग मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणारा असतो. दर हंगामात कुठे न कुठे अशा घटना घडतात. यामुळे पालक आपल्या मुलींना शाळेत पाठवण्यास उत्सुक नसतात.

८. प्रशासकीय अनास्था हाही अत्यंत महत्त्वाचा घटक मुलांना शाळेत जाण्यापासून रोखतो. उदा. मुलांकडे दप्तरे, पाठ्यपुस्तके, वह्या, गणवेश यासारख्या गोष्टी नसतात आणि त्या उपलब्ध करून देण्याची सोय शाळांमध्ये नसते. शाळेत मिळणारे दुपारचे जेवण हे शाळेतील मूळच्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर मिळते. समजा स्थलांतरित मुले शाळेत दाखल झालीच, तर त्यांच्यासाठी लागणारा जास्तीचा शिधा, स्वयंपाक करणाऱ्या कामगारांचे मानधन याची तरतूद शाळांमध्ये केलेली नसते.

९. मुलांच्या घरात, गावात, परिसरात बोलली जाणारी भाषा आणि स्थलांतर होऊन गेलेल्या गावातील भाषा यात तफावत असते. कधी मुलांची मातृभाषा मराठी नसते, त्यामुळे वर्गात नेऊन बसवले तरी काय चालू आहे हे कळतच नाही. मुले त्यांच्या गावी असताना जो अभ्यासक्रम सुरू असतो तोच इथे पुढे चालू असेल असे होत नाही. या मुलांचा आणि स्थानिक मुलांच्या शिकण्याचा वेग सारखा नसतो. अशा वेळी या मुलांना वेगळे शिकवणे गरजेचे असते. मात्र शिक्षकांकडे तेवढा वेळही नसतो आणि तशी मानसिकताही नसते.

१०. स्थलांतरित मुलांचे दिसणे, कपडे स्थानिक मुलांपेक्षा वेगळे असते. त्यांना स्थानिक समवयस्क मुलांकडून वारंवार हेटाळणीला सामोरे जावे लागते.

इतरही अनेक कारणांचा या मुलांच्या जगण्यावर, शिक्षणावर परिणाम होत असतो. स्थलांतरित मुलांच्या शिक्षणासाठी फक्त शिक्षण विभागाकडे बोट करून चालणार नाही. कारण या मुलांचे जगण्याचे प्रश्न हे फक्त शिक्षणासोबत जोडलेले नाहीत. प्रशासनाच्या विविध विभागांनी एकत्र येऊन प्रयत्न केले, तर कदाचित काही प्रश्न सुटू शकतील. गावातील स्थानिक लोक, साखर कारखान्यांचे नेते, शेतकरी, प्रशासकीय अधिकारी ते धोरणकर्ते अशा सगळ्यांनी स्थलांतरित मजुरांसाठीच्या दीर्घकालीन धोरणांचा विचार करणे फार गरजेचे आहे.

पुरेसा विचार न करता घेतले गेलेले निर्णय अनेकवेळा कुचकामी असतात. असाच एक निर्णय म्हणजे स्थलांतरित मुलांसाठी ‘अनिवासी वसतिगृहे’ (निवास सोडून बाकी सुविधा, मुख्यतः जेवण) असावीत. पालकांनी आपल्या मुलांना आपल्या गावी जवळपासच्या नातेवाईकांकडे किंवा ओळखीच्या घरी ठेवावे. या मुलांच्या आहाराची सोय शाळेतून करण्यात येईल असा एक निर्णय काही वर्षांआधी घेण्यात आला होता. आता आपले गाव सोडून तीन-चारशे किलोमीटर कुठेतरी परमुलखात कामाला जाणारे पालक आपल्या मुलांना असे मागे ठेवून जाणे अवघड असते. मुलांच्या सुरक्षिततेचा विचार करता पालकांना ते योग्य वाटत नाही ही अगदी साधी गोष्ट आहे. मग ज्या ठिकाणी हे होताना दिसते ती उदाहरणे घेऊन अशा धोरणांचे समर्थन केले जाते.



आशा प्रकल्पातील पाच वर्षे आणि दहा हजार कुटुंबांसोबत सातत्याने केलेल्या कामातून उपाययोजनांची दिसणारी दिशा काय सांगते –

१. मागच्या वर्षी 'गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी कामगार महामंडळा'ची स्थापना झाली. आता बीड, जालना आणि परभणी या जिल्ह्यांमधून मुलांसाठी निवासी वसतिगृहांची सोय केली जात आहे. हे एक अत्यंत स्तुत्य पाऊल आहे. परंतु ऊसतोडणी कामगार साधारणपणे पंधरा ते अठरा जिल्ह्यांमधून येतात. त्यामुळे उरलेल्या जिल्ह्यांतील मुलांसाठीही काही सोय करायला हवी आहे. हे विखुरलेले स्थलांतरित मजूर कारखान्यावर एकाच क्षेत्रात असतात. कारखान्याच्या आसपास निवासी वसतिगृहे आणि शाळांची सोय झाली, तर मुलांचे शिकणे जास्त सोयीचे होऊ शकते. असा पथदर्शी प्रयोग करायला हवा.

२. स्थलांतरित मुलांच्या नीट नोंदी होण्याची गरज आहे. एकूण किती मुले स्थलांतरित झाली, ती कुठे गेली आणि जिथे गेली तिकडे त्यांचा शाळेत प्रवेश झाला की नाही, याच्या नोंदी असणे गरजेचे आहे. यामुळे योग्य निर्णय घ्यायला मदत होऊ शकेल. यासाठी अनेकवार सर्वेक्षण करण्यात येते; पण त्यातली आकडेवारी विश्वासार्ह नसते.


३. स्थलांतरित मुलांसाठी पाठ्यपुस्तके, वाचन-लेखनसाहित्य याची तरतूद शाळांमध्ये करता आली तर मुलांना शिकणे सोपे जाऊ शकते. पालकांसमोर जगण्याचे इतर प्रश्न आ वासून उभे असताना मुलांना हे साहित्य विकत घेऊन देणे ही अवघड गोष्ट असते.

४. शाळेत मिळणारे दुपारचे जेवण हे दररोज शाळेत उपस्थित मुलांच्या संख्येवर ठरवणे सोपे नाही आणि अचानक वाढलेल्या संख्येला पुरेसे जेवण देणेही शक्य नाही असे हे त्रांगडे आहे. गावात दरवर्षी साधारणपणे किती कुटुंबे स्थलांतरित होऊन येतात ह्याचा अंदाज स्थानिक प्रशासनाला असतो. त्यावर आधारित वाढीव मुलांसाठी त्या नियोजित काळात काही तरतूद करणे शक्य आहे का याचा विचार करायला हवा.


५. शिक्षकांवर असलेल्या अशैक्षणिक कामाचा वाढलेला बोजा, दररोज नव्याने निघणारे आदेश, कुठूनही न मिळणारी मदत अशा नकारात्मक परिस्थितीमध्ये अडकलेले शिक्षक या मुलांकडे 'आपल्या डोक्यावर आलेले वाढीव काम' अशा स्वरूपात बघतात. त्यामुळे ते ह्या मुलांना शाळेत प्रवेश द्यायला आणि शिकवायला उत्सुक नसतात. अशा वेळी शिक्षकांसोबत प्रशासकीय यंत्रणेने पुरेसा संवाद साधण्याची गरज आहे. हे काम फक्त जी. आर. काढून होत नसते; त्यासाठी यंत्रणेचीही मानसिक तयारी असायला हवी.

६. या सगळ्यात साखर कारखाने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. खरे तर ती त्यांची जबाबदारीही असते; परंतु ते कुठलीही जबाबदारी घ्यायला पुढे येताना दिसत नाहीत. सोमेश्वर सहकारी कारखान्याने पाच वर्षे सुरू असलेल्या टाटा ट्रस्टच्या 'आशा प्रकल्पा'तून प्रेरणा घेऊन आपणहून 'कोपीवरची शाळा' हा प्रकल्प गेली दोन वर्षे यशस्वीपणे राबवला आहे. कारखान्याचे अध्यक्ष आणि संचालक मंडळाने पुढाकार घेऊन स्थलांतरित मुले शिकती राहतील य़ासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आज दोनशेपेक्षा जास्त मुले या ठिकाणी नियमितपणे शिकतात. असेच प्रयत्न इतरही कारखान्यांवर व्हायला हवे आहेत. ही साखर कारखान्यांची जबाबदारी आहेच.

७. चौदा आणि पंधराव्या वित्त आयोगाने ग्राम पंचायतींना त्यांच्या गावचे विकास-आराखडे ठरवण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे आणि त्याप्रमाणे, मुबलक नसले तरी किमान काही गोष्टी करता येतील, असे बजेटही दिलेले असते. या ग्रामविकास आराखड्यांमध्ये हंगामी स्थलांतरित मजुरांसाठी निवारा, वीज, पिण्याचे पाणी, शौचालयांची सुविधा, आरोग्यसेवकांकडून औषधोपचार अशा मूलभूत गोष्टींचे नियोजन केले, तर ह्या कुटुंबांचे



'जीवनकोंडी' – दहा हजार ऊसतोडणी कामगार आणि साधारणपणे पाच हजार मुले ह्यांच्या अत्यंत बारकाईने केलेल्या नोंदी आणि अभ्यासावर आधारित संशोधनपर पुस्तक.
प्रकाशक – रोहन प्रकाशन



'शिक्षणकोंडी' – ऊसतोडणी कामगार-मुलांसोबत काम करताना आलेल्या अनुभवांचे संकलनात्मक पुस्तक. राज्यशासनाच्या २०१९ च्या कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित.
प्रकाशक – रोहन प्रकाशन

जगणे सुसह्य होऊ शकते. सहा वर्षांच्या आतील मुलांसाठी पाळणाघर असणे गरजेचे आहे. त्याचेही नियोजन यात करता येऊ शकते. मुलांचा अभ्यास घेण्यासाठी 'शिक्षण-मित्र' नेमता आले, तर शाळेतील शिक्षकांनाही त्याचा उपयोग होऊ शकतो. यात ह्या मुलांनी शाळेत प्रवेश घेऊन शिकणे आणि त्यांना शिक्षणमित्रांकडून ब्रिज कोर्स पद्धतीने शिकण्यात मदत होणे अपेक्षित आहे.

ऊसतोडणी कामगारांच्या प्रश्नांकडे फक्त एका वंचित घटकाचा प्रश्न म्हणून बघून भागणार नाही. आपण स्वीकारलेल्या विकासाच्या तथाकथित मॉडेलने निर्माण केलेल्या अनेक प्रश्नांपैकी एक महत्त्वाचा प्रश्न असे याकडे बघायला हवे आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपण सगळ्यांनी या प्रश्नाकडे बघताना 'अरेरे, बिचारे कसे राहतात न, कपडेपण नीट नाहीत, जेवायला नाही बिचाऱ्यांना' अशा ठरावीक कणव करण्याच्या भावनेतून बाहेर पडण्याची गरज आहे. समाज म्हणून आपण सर्वांनी या प्रश्नाच्या व्यामिश्रतेकडे लक्ष देण्याची गरज आहे. या मजुरांना कामगार म्हणून मान्यता मिळण्याची गरज आहे. या वस्त्यांवर येऊन वाढदिवस साजरे करणे, त्यांना जेवण देणे, जुने चांगल्या स्थितीतले कपडे त्यांना देणे, वह्यापुस्तके देणे हे सगळे समाज म्हणून आपण करतो हे एका पातळीवर चांगलेही आहे; परंतु या कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी आपण काय करणार हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आपण आपले आयुष्य निवांत जगत असताना आपल्याच गावकुसाबाहेर, लहानपण फेकून देऊन मोठ्या वयाच्या माणसांचे ओझे वागवणारी ही लहान मुले, शिक्षणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या मूलभूत अधिकारापासून वंचित ठेवलेली ही मुले, बाहुल्यांशी खेळण्याच्या वयात कोयत्यासोबत खेळणारी ही मुले आपल्या माणूसपणावर उभारलेली प्रश्नचिन्हे आहेत!

परेश जयश्री मनोहर

paresh.jm@gmail.com



लेखक टाटा ट्रस्टमध्ये सिनियर मॅनेजर आहेत. २२ वर्षे ते सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. गेली ७ वर्षे ते ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसोबत काम करतात तसेच टाटा ट्रस्टच्या 'डिजिटल एज्युकेशन गॅरंटीकार्ड' या प्रकल्पाचे काम पाहतात.

छायाचित्रे : अजहर नदाफ

बेटी बचाओ! बेटी पढाओ!...

ऊसतोड कामगारांच्या मुली देशाच्या 'बेटी' नाहीत काय???

पल्लवी हर्षे, स्वाती सातपुते, साधना सावंत, प्रकाश रणसिंग

"१२ वर्षातच माझ्या आईचं लग्न झालं. आणि माझंपण लग्न १३-१४ व्या वर्षी झालं. मला चार मुली आणि एक मुलगा. माझ्या मुलींचेपण लग्नं मी त्याच वयात लावून दिली. अजूनपण कारखाना चालूच आहे आणि माझ्या मुलीपण कारखानाच करतात. लोक म्हणत्यात लवकर लग्नं केली. आमी कारखान्याला जायचो; मग मुली ठेवायच्या कुठे. त्याच्यामुळे दिले पटापटा लग्न लावून. त्यापण आता त्यांच्या मुलांना कारखान्याला घेऊन जातात. त्याचंपण असंच होतं काय तं? माझं लग्न झालं कोयत्यासाठी. माझ्या मुलींचे पण लग्नं झाली कोयत्यासाठी. आमचा तिसऱ्या पिढीवर चालला ह्यो कारखाना. म्हणून वाटतंय कुठे तरी थांबलं पाहिजे हे."

– सुमनताई, मराठवाड्यातील महिला ऊसतोड कामगार

अशी अनेक कुटुंबे ऊसतोडीच्या दुष्टचक्रात पिढ्यान्‌पिढ्या अडकलेली आहेत. देशामधील साखर कारखान्यांपैकी जवळपास ३६% साखर कारखाने महाराष्ट्रात आहेत. ऊसतोडीचा हंगाम दरवर्षी दसऱ्यापासून सुरू होऊन एप्रिल-मे महिन्यापर्यंत चालतो. कामगार ऊसतोडीसाठी जोडीने म्हणजे सहसा पती-पत्नी एकत्र जातात; ज्याला 'एक कोयता' म्हटले जाते. त्यातील एकच पुरुष किंवा स्त्रीच्या नावाने उचल घेतली असल्यास त्याला 'अर्धा कोयता' म्हणतात. ऊसतोड कामगार कोयत्यांना एकत्र करून टोळीने ऊसतोडीसाठी घेऊन जाण्याचे काम मुकादम करतो. हे कामगार वर्षातील निम्मा काळ स्वतःच्या गावापासून स्थलांतरित होऊन अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये कष्टाचे काम करत असतात. परंतु कामगार म्हणून त्यांची कुठेही कायदेशीर नोंद नाही. नवीन अनोळखी गावांमध्ये असुरक्षित व अपुरी राहण्याची सोय, पाण्याची व शौचालयाची कुठलीही सुविधा नसणे यापासून ते जवळपास १५ तास कष्टाचे काम, सुट्ट्यांची

कोणतीही तरतूद नसणे असे ऊसतोड कामगारांचे अनेक प्रश्न आहेत.

यापैकी बहुतेक ऊसतोड कामगार आपल्यासोबत लहान मुलांनाही घेऊन जातात. शिक्षण घेण्याच्या वयात ही मुले उसाच्या फडात, कोप्यावर, अशा असुरक्षित वातावरणात राहतात किंवा आईवडिलांसोबत ऊस तोडताना दिसतात. सोपेकॉमच्या[१] माध्यमातून बीड व हिंगोलीमधील एकूण ८४ गावांमध्ये ऊसतोडीला जाणाऱ्या कुटुंबांतील सभासदांबाबत २०२२ मध्ये एक सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात अशा ६०५० कुटुंबांचा समावेश असून एकूण २११७२ व्यक्तींची माहिती घेण्यात आली. २११७२ पैकी १८ वर्षांच्या खालील ८०९१ मुले आहेत आणि त्यातील ५२% मुले ऊसतोडीला सोबत तरी जातात किंवा ऊसतोडीचे काम करतात. म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात मुले ऊसतोडीला सोबत जातात. जवळपास ६ महिने बाहेरगावी राहिल्यामुळे त्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होतो. मुलींच्या बाबतीत तर गंभीर समस्या निर्माण होतात.

महिला किसान अधिकार मंच[२] (मकाम) च्या माध्यमातून २०१९ साली बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, परभणी व सोलापूर ह्या ८ जिल्ह्यांमधील १०४२ महिला ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण[३] करण्यात आले. या सर्वेक्षणात ६ ते १८ वयाची एकूण १३५२ मुले होती. या मुलांचे शिक्षण सुटण्याची आणि विवाह होण्याची टक्केवारी तपासली असता असे लक्षात आले, की १३ ते १८ वयोगटातील शिक्षण न घेणाऱ्या मुलांमुलींमध्ये मुलींच्या विवाहाचे प्रमाण अधिक होते. या वयोगटातील शिकत नसलेल्या मुलांची संख्या १३१ होती. त्यापैकी ६१ मुलगे आणि ७० मुली होत्या. ह्या मुलींपैकी ३०% मुलींची लग्ने झालेली होती. मुलांमध्ये हे प्रमाण ५% एवढे होते.

गावाच्या ठिकाणी आणि फडावर अशा दोन्ही ठिकाणी मुलींच्या बाबतीत वाटणारी असुरक्षितता हे त्यांचे लग्न लावून देण्यामागचे मोठे कारण आहे. प्रत्यक्ष ऊसतोडीच्या ठिकाणी तरुण मुली, महिलांचे लैंगिक शोषण होणे सहज शक्य असते. मुली खोपीवर असल्या, की गावातील लोक खोपीवर चकरा मारतात, दुसऱ्या टोळीतील काही पुरुष मुद्दाम खोपीवर येतात आणि मुलींशी लगट करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून कुठेही गेले तरी आईवडील मुलींना सोबत ठेवतात. 'मकाम'च्या एका अभ्यासात महिलांनी त्यांचे लहानपणीचे अनुभव सांगितले.

लक्ष्मीताई (नाव बदलले आहे) लहानपणापासून ऊसतोडीला जात आहेत. मुलाखतीमध्ये त्यांनी त्या ११-१२ वर्षांच्या असताना त्यांच्यावर ओढवलेल्या एका प्रसंगाबाबत सांगितले. ''मकरसंक्रांतीचा सण असल्यामुळे इतर मुलींसोबत मी खोपीवर थांबले. छान तयार होऊन खोपीवरचे सगळे जिथे ऊस तोडायला गेले होते त्या ठिकाणी इतर मुलींसोबत जायला निघाले. तेव्हा माझ्या पायाला कुत्रा चावला म्हणून मी मागे राहिले. सोबतच्या मुली पुढे निघून गेल्या. मला एकटीला बघून त्या गावातील दोन-तीन माणसे गाडी घेऊन माझ्या मागे येऊ लागली. काही वेळासाठी मला वाटले, की मी आता वाचणार नाही कारण आमच्या टोळीतली एक बाई सांगत होती, असेच एका पोरीला पकडून त्या गावातील माणसांनी तिच्यावर बलात्कार केला आणि तिला विहिरीत टाकून मारून टाकले. जिकडे कुणीतरी माणसं दिसत होते त्या बाजूने पळत गेले, आजूबाजूला शेतात लोकं दिसायला सुरवात झाली. मग त्या गावातील लोकांनी माघार घेतली. त्या प्रसंगापासून माझे आईवडील मला एकटीला केव्हाच मागे खोपीवर ठेवत नसत, सोबत घेऊन जात.''

ऊसतोडीच्या ठिकाणी किंवा गावातही एकट्या तरुण मुलीला सोडणे पालकांना सुरक्षित वाटत नसल्यामुळे त्यांचे शिक्षण थांबते आणि लहान वयात त्यांचे लग्न करून दिले जाते अशी अनेक उदाहरणे दिसून येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते, की स्त्रिया ह्या जातिव्यवस्थेचे प्रवेशद्वार आहेत. म्हणजे जातिव्यवस्था टिकवण्यासाठी स्त्रियांचे लैंगिक नियंत्रण गरजेचे आहे. या कारणाने भारतात स्त्रियांच्या योनिशुचितेला अतीव महत्त्व आलेले आहे. या सर्वाचा परिपाक म्हणजे मुलींचे जातिबाह्य लग्न होईल, मुलीवर अतिप्रसंग होईल आणि यामुळे त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होईल, समाजात आपली 'इज्जत' जाईल अशी पालकांना भीती वाटते. फक्त मुलींचीच लहान वयात लग्ने लावून दिली जातात असे नाही; मुलग्यांचेही लहान वयात लग्न होताना दिसून येते. वर सुमनताईच्या उदाहरणात दिसल्याप्रमाणे मुलामुलींचे लग्न करून टाकले, तर एक कोयता तयार होतो आणि अधिक उचल घेता येते हे आर्थिक गणितही पालकांच्या मनात असतेच.

मुलींची लग्ने कमी वयात झाल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. सीमा (नाव बदलले आहे) या ३० वर्षांच्या असून ऊसतोड कामगार आहेत. त्यांचे लग्न वयाच्या १४ व्या वर्षी झाले. तेव्हापासून त्या ऊसतोडीला जातात. त्यांना दोन मुली आणि एक मुलगा आहे. वयाच्या १५ व्या वर्षी पहिले मूल आणि १९ व्या वर्षी तिसरे. त्यांची कुटुंब-

नियोजनाची शस्त्रक्रिया झालेली आहे. ऊसतोडीला गेल्या असताना पाळी आल्यावर काय काळजी घेतात याबाबत त्या सांगतात, की पाळी आली तरी त्यांना त्यांच्या वाटेचे घरातील व ऊसतोडीचे काम करावेच लागते. कुठल्याही प्रकारची शारीरिक विश्रांती मिळत नाही. वैयक्तिक स्वच्छतासुद्धा घेतली जात नाही. पाळीची घडी आज सकाळी अंघोळीच्या वेळी घेतली असेल, तर दुसऱ्या दिवशीच अंघोळीच्या वेळी दुसरी घडी घेतात. तिथे पाण्याची सोय नसल्याने जेवढे मिळेल तेवढे आणि जसे असेल त्या पाण्यात कापड धुतात. ते व्यवस्थित धुतले गेले की नाही, हेसुद्धा त्या पाहत नाहीत. गरोदरपणामध्येसुद्धा त्यांनी ऊसतोडीचे काम केले आहे आणि बाळंतपण झाल्यावरही. १९ व्या वर्षी कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन झाल्यानंतर २-३ वर्षांनी त्यांना अंगावरचे जाणे, ओटीपोटात दुखणे असे त्रास होऊ लागले. डॉक्टरांनी सांगितले, की तुमची गर्भपिशवी खराब झाली आहे, तिला गाठ आली आहे, त्यामुळे ती काढावी लागेल. वयाच्या केवळ २५ व्या वर्षी त्यांचे गर्भपिशवीचे ऑपरेशन झाले. आता त्यांना कंबरदुखी, मानेचा त्रास, पाय दुखणे, पायात गोळे येणे, लगेच थकवा येणे असे त्रास होतात. त्या सांगतात, ''माझ्या सासूचेसुद्धा गर्भपिशवीचे ऑपरेशन झालेले आहे. परंतु ते त्यांच्या वयाच्या पस्तीस-चाळिशीत. त्यामुळे त्यांना कुठलाही त्रास होत नाही. मला मात्र खूप त्रास होतो. अंगात त्राण आहे की नाही असे वाटते.'' ही केवळ एकट्या सीमाताईची परिस्थिती नाही. एकंदरीत ऊसतोडीला जाणाऱ्या सगळ्याच महिलांचे अशा प्रकारचे अनुभव आहेत.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-४ च्या माहितीनुसार महाराष्ट्रातील एकूण पुनरुत्पादक वयोगटातील महिलांमधील गर्भपिशवी काढण्याचे प्रमाण २.६% आहे. देशासाठी हे प्रमाण ३.२% आहे. 'मकाम'ने केलेल्या १०४२ महिला ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षणात हेच प्रमाण ८.४% (८८ महिला) एवढे दिसून येते. ह्यापैकी ४३ (४९%) महिलांचे वय ३५ पेक्षा कमी आहे असे दिसून आले.

'मकाम'शी संलग्न असलेल्या महिला ऊसतोड कामगार संघटनेअंतर्गत अनेक महिला मागणी करत आहेत, की ऊसतोडीला जावेच लागू नये यासाठी शासनाने उपाययोजना कराव्यात. हे लांब पल्ल्याचे उद्दिष्ट आहे. गावात पर्यायी उपजीविकेची साधने उभी राहीपर्यंत त्यांना ऊसतोडीला जावेच लागणार आहे. अशा परिस्थितीतही पुढील पिढीला, विशेषतः मुलींना, फडावर जावेच लागू नये यासाठी तातडीने उपाययोजना करणे नक्कीच शक्य आहे. मुलींना ऊसतोड हंगामात राहण्यासाठी आणि शिक्षणासाठी पर्यायी सुविधा उपलब्ध करून दिल्यास मुलींची शिक्षणातून गळती कमी होऊ शकेल. शिक्षण चालू राहिले तर त्यांची लग्नेही कमी वयात होणार नाहीत आणि पुढील नकारात्मक परिणामही टाळले जातील.

या दृष्टीने १५ जून २०२१ रोजीचा 'स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करणेबाबतचा' शासन-निर्णय हे महत्त्वाचे पाऊल आहे. त्यासाठी निधीही उपलब्ध करून दिलेला आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. परंतु शासन-निर्णय जरी २०२१ मध्ये पारित झालेला असला, तरी त्याची अंमलबजावणी अजून सुरू झालेली नाही. २०२३ च्या जूनमध्ये बीड जिल्ह्यात १० वसतिगृहे (५ मुलींची - ५ मुलांची) सुरू होणार असल्याचे कळले आहे. प्रत्येक वसतिगृहाची १०० मुलांची क्षमता आहे. त्या अनुषंगाने यावर्षी केवळ १००० मुलांची (५०० मुली, ५०० मुलगे) सोय होईल असे दिसते. ऊसतोडीला पालकांसोबत जाणाऱ्या मुलांची संख्या त्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. त्यामुळे ही व्यवस्था पुरेशी नाही. तसेच वसतिगृहात सुरक्षित वातावरण नसेल, तर पालक आपल्या मुलींना तिथे ठेवण्यासाठी उत्सुक राहणार नाहीत. त्यामुळे त्या दृष्टीनेही पावले उचलण्याची गरज आहे.

पल्लवी हर्षे, स्वाती सातपुते,
साधना सावंत, प्रकाश रणसिंग

('मकाम'च्या माध्यमातून करण्यात आलेले सर्वेक्षण तसेच 'सोपेकॉम' मधील सीमा कुलकर्णी, स्नेहा भट व महिला ऊसतोड कामगार संघटनेच्या कार्यकर्त्या मनीषा तोकले, छाया पडघन व इतर तालुका व गावनिहाय कार्यकर्त्यांच्या मदतीमुळे आणि दिलेल्या माहितीमुळे हा लेख लिहिणे शक्य झाले आहे. त्या सर्वांचे आभार.)

[१] सोपेकॉम ही स्वयंसेवी संस्था असून नैसर्गिक संसाधनांच्या समन्यायी वाटपासाठी कार्यरत आहे. https://www.soppecom.org/aboutus.htm

[२] महिला किसान अधिकार मंच या नेटवर्कचे भारतात २४ राज्यांमध्ये काम सुरू आहे. त्याचा मुख्य उद्देश महिला शेतकरी म्हणून ओळख मिळवून देणे असा आहे. मकामचे महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांमध्ये विविध विषयांवर काम आहे.

[३] https://www.soppecom.org/pdf/Cane-cutters-eport-Final-English-09-09-20.pdf

शिक्षणाचा मूलभूत हक्क वंचित घटकाला मिळतो का?

विनायक माळी

मराठवाड्यातून दरवर्षी ऑक्टोबर ते मार्च या काळामध्ये दहा ते बारा लाख ऊसतोड मजूर पोटाची खळगी भरण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतरित होतात. त्यांच्याबरोबर त्यांची मुलेदेखील असतात. स्थलांतरामुळे ही मुले त्यांच्या शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहतात. शिक्षणामध्ये खंड पडल्यामुळे त्यांची शिकण्यातली गोडी कमी होते. ती वर्गात मागे पडू लागतात आणि अनेकदा शाळेतून बाहेरही पडतात. त्यांच्या हातातही लहानपणीच कोयता येतो. पूर्वी या मुलांसाठी सरकारमान्य साखरशाळा चालवल्या जायच्या; पण काही कारणास्तव गेली ११ वर्षे या शाळा बंद पडल्या आहेत.

या मुलांच्या शिक्षणासाठी काय करता येईल हा विचार आम्हा काही युवकांच्या पुढाकाराने कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात सुरू झाला. त्यातून सेवांकुर साखरशाळेचा उपक्रम सुरू झाला. गेली सात वर्षे अब्दुल लाट येथे आम्ही हे काम करत आहोत. मुलांना शाळेत यावेसे वाटावे, ती शाळेत रमावीत, किमान लेखन वाचन शिकावीत म्हणून आम्ही अनेक सर्जनशील पद्धतींनी प्रयत्न करतो. या कामात अनेक अडथळे आहेत. या शाळांना सरकारी मदत मिळत नाही. या मुलांबरोबर आम्ही चारच महिने काम करतो. मुलांच्या शिक्षणाचे पुढे काय होईल हे आमच्या हातात नसते. 'दरवर्षी नवीन मुले येतात' ह्या कारणाने निधी पुरवणाऱ्या संस्थांच्या कक्षेत आमचे काम बसत नाही. काही मित्रांच्या मदतीने आम्ही सर्व ताकदीने हे काम करत आहोत. आम्ही हा वसाच घेतला आहे.

हे काम करताना आम्हाला या मुलांच्या, ऊसतोड-मजुरांच्या प्रश्नांचा जवळून अभ्यास करण्याची संधी मिळाली. त्यातून खूप काही शिकायलाही मिळाले. त्यातील काही गोष्टी सांगाव्याशा वाटतात.

मल्हार इयत्ता सहावीचा विद्यार्थी. बीड जिल्ह्यातील केज हे त्याचे गाव. आईबाबा आणि दोन भावंडे असे त्याचे कुटुंब येथे ऊसतोड करण्यासाठी आले होते. त्यांनी गावाकडील शेळ्याही सोबत आणल्या होत्या. दिवसभर आईबाबा ऊसतोडीला जात. मग शेळ्यांची पिल्ले आणि दोन लहान भावंडांना सांभाळायची जबाबदारी मल्हारवर आली होती. मल्हार घरातील सर्वात मोठा मुलगा. त्यामुळे एका जबाबदार व्यक्तीप्रमाणे तो आपल्या गावाकडील शाळेतून सहा महिने रजा घेऊन शेळ्या आणि भावंडे सांभाळण्यासाठी अब्दुल लाट गावी आला होता. मल्हारला अभ्यासकेंद्रात ये म्हणून सांगितल्यावर तो म्हणाला, ''मला शेळ्या सांभाळायच्या आहेत. शेळ्यांना घेऊन शाळेत आलो तरच मला शाळा शिकणे शक्य आहे.'' सेवांकुर प्रकल्पाची अभ्यासकेंद्रे ऊसतोड मजुरांच्या पालाजवळच चालतात. त्यामुळे आम्ही शेळ्यांची पिल्ले घेऊन येण्याची परवानगी दिल्यावर मल्हार नियमितपणे येऊ लागला. शाळेच्या बाहेर एका कोपऱ्यात तो पिल्ले बांधून ठेवी. उघड्यावरचा संसार असल्यामुळे मल्हारसारखी अनेक मुले घराची रखवाली करत शेळ्या-मेंढ्यांची उसाभर करण्यात व्यस्त असतात. त्यामुळे ती शिक्षणाच्या प्रवाहात येऊ शकत नाहीत.

दिव्या गावाकडे सहावीला होती. तिच्यापेक्षा मोठ्या चार बहिणींची लग्ने झालेली आहेत. त्याचे कर्ज फेडण्यासाठी दिव्याचे आईबाबा पश्चिम महाराष्ट्रात आलेत. सोबत दोन बहिणी व एक छोटा भाऊ युवराज! हो, तो युवराजच आहे.



कारण सहा बहिणींवर तो झालाय. दिवसभर खोपीवर राहून दिव्या आपल्या लहान भावंडांचा सांभाळ करते. सेवांकुर अभ्यासकेंद्र सुरू करणार आहे म्हटल्यावर, 'मी नाही येणार शाळेला. आई रागवते. नको म्हणते शाळा' असे म्हणाली.

उशिरा रात्री पालावर जाऊन 'दिव्याला अभ्यासकेंद्रात पाठवा, भावंडाना घेऊन येऊ देत' म्हणून तिच्या आईला चार-पाच वेळा समजावून सांगितले. तेव्हा कुठे तिच्या आईने परवानगी दिली. धाकट्या बहिणी व भावाला सोबत घेऊन दिव्या शाळेत येऊ लागली. ती सहावीत असली तरी तिला अजून लिहिता-वाचता येत नाही. आईबाबा सकाळी ऊस तोडायला निघून गेल्यावर रात्री ते परत येईपर्यंत पालावरच्या पोरांची काळजी घेणाऱ्या दिव्याने एकदा शाळेत एक चित्र काढले. त्यात दिव्याचे भावविश्व आहे. चित्रात एक मुलगी आहे. ती खूप छान नटली आहे. डोक्यात सुंदर फूल घातले आहे. हातात एक छान पर्स आहे. आणि ह्या सोबतच दिव्याने त्यात अजून एक गोष्ट काढली आहे. त्या मुलीच्या डोक्यावर घागर आहे. मला समजले, 'मी काल्पनिक दुनियेत कितीही नटले, तरी माझ्यावरील जबाबदारी मी नाही सोडू शकत' असे दिव्याला म्हणायचे आहे.



कोहिनूरची हकिकत या प्रश्नाचे अनेक आयाम समोर ठेवते. विचार करायला प्रवृत्त करते. आमच्या सेवांकुर साखरशाळेत कोहिनूर हा नव्याने दाखल झालेला विद्यार्थी! बीड जिल्ह्यातील एका छोट्या गावातील १२ वर्षांचा मुलगा. त्याचा मोठा भाऊ अविनाश १४ वर्षांचा. दोघेही आपल्या आईवडिलांसोबत ऊसतोडीला मदत म्हणून आले आहेत. दोघांच्याही अंगावर आईबापानी कर्ज उचलले आहे. ती दोघे कधीच शाळेत गेलेली नाहीत. कायम भटके जीवन. वर्षातील ६ महिने ऊसतोडी करायची आणि उरलेले ६ महिने विहीर खोदणे, सोयाबिन काढणे हेच त्यांच्या कुटुंबाचे काम. काही दिवसांपूर्वी दोघे भाऊ आईवडिलांसोबत ऊस तोडत होते. अविनाशचा कोयता फडात अति वेगाने चालत होता. लगतच्या सरीत आपला लहान भाऊही ऊस तोडतो आहे याचे भानही त्याला राहिले नाही. त्याचा कोयता कोहिनूरच्या उजव्या पायावर बसला. त्याचा पाय जबर जखमी झाला. त्याला २० टाके बसले आहेत. पायाचे हाडही मोडलेय. डॉक्टरांनी पुढील २-३ महिने काम न करता काळजी घ्यायला सांगितले आहे.

सेवांकुर टीम सर्वेक्षणासाठी पालावर गेली असता एका हातात काठी घेऊन कोहिनूर ताईच्या जवळ आला. 'मला पण शाळेत घेता का?' त्याने निरागसपणे विचारले. ताईने त्याचे नाव आपल्या यादीत घेतले. आणि काही काळासाठी का होईना, कोहिनूरचा शिक्षण-प्रवास सुरू झाला.

एक हातात काठी घेऊन कोहिनूर रोज शाळेत येतो. आपले राष्ट्रगीत आयुष्यात पहिल्यांदाच ऐकल्याचे त्याने ताईला सांगितले. पहिलीला कोण कोण आहे, असा ताईने प्रश्न विचारल्यावर १२ वर्षांचा कोहिनूर काठी घेऊन उभा राहतो. ताई वर्गात गोष्ट सांगत असते तेव्हा तो ती काळजीपूर्वक ऐकतो. त्या गोष्टीचा सारांश सांगतो. त्याने आयुष्यात पहिल्यांदाच पाटी-पेन्सिल हातात घेतली आहे. तो शाळेत नियमित येतोय. मात्र त्याचा पाय बरा होईपर्यंतच तो शाळेत येऊ शकतो. म्हणजे पाय बरा होईल हे त्याचे भाग्य म्हणावे की दुर्भाग्य कळत नाही. कारण नियतीने त्याच्याशी वेगळा खेळ खेळला आहे. दुष्काळी भागात जन्म, अशिक्षित आईवडील, पिढ्यान्‌पिढ्यांचे दारिद्र्य या दुष्टचक्रातून तो कधीच सुटू शकणार नाही असे सध्याची त्यांची परिस्थिती पाहून वाटते.


अखिलेश गावाकडील शाळेत दुसरीत शिकतो. गेल्या वर्षी तो साखरशाळेत येत होता. हंगामाच्या काळात त्याचे आईवडील ऊसतोडीला येतात. गावाकडील घरी कोणी सांभाळणारे नसल्यामुळे त्यांना त्याला तोडीला बरोबर घेऊन यावे लागले. दिवसभर मातीत खेळणारा अखिलेश सेवांकुरच्या अभ्यासकेंद्रांत नियमितपणे येऊ लागला. कृती, खेळ, गाणी, गप्पा या आनंदाने शिकण्याच्या सेवांकुरच्या पद्धतीमुळे अखिलेशला शिकण्याची गोडी लागली. सेवांकुरचे कार्यकर्ते त्याच्या गावाकडे भेट द्यायला गेले होते. तेव्हा अभ्यासामध्ये झालेल्या त्याच्या प्रगतीबद्दल त्याच्या आईने सेवांकुर अभ्यासकेंद्राचे आभार मानले.

गेली ७ वर्षे 'नको तोडू माझी शाळा' हे ब्रीदवाक्य घेऊन हंगामाच्या काळात ऊसतोड मजुरांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी, ती शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहावीत यासाठी 'विद्योदय मुक्तांगण परिवार सामाजिक संस्थे'च्या पुढाकाराने विविध प्रयत्न सुरू आहेत. पण आपला देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना आजही असे हजारो मल्हार, कोहिनूर, दिव्या, अखिलेश आपल्याला पाहायला मिळतात ही एक खंत मनात आहे.

विनायक माळी

vinayakmali90@gmail.com

लेखक शिरोळ (जिल्हा कोल्हापूर) येथील विद्योदय मुक्तांगण परिवार या सामाजिक संस्थेचे सहसंस्थापक आहेत. २०१६ सालापासून ते ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी सेवांकुर साखरशाळा अभ्यासकेंद्राचे आयोजन करतात त्याचबरोबर त्यांचा अनेक सामाजिक उपक्रमांत सहभाग असतो.







सोमनाथ रावसाहेब रंदवे

आमचं कुटुंब चार जनांचं! आई, वडील, मोठा भाऊ सचिन आणि मी. बीड जिल्ह्यातील मारेखाडी हे आमचं मूळ गाव. चार एकर कोरडवाहू जमीन. बीड हे दुष्काळी क्षेत्र असल्यानं पिण्याच्या पाण्याची टंचाई. आणि शेतीसाठी तर पावसावरच अवलंबून राहावं लागतं.

साधारणपणे २० वर्षांपूर्वी आमचं कुटुंब रोजगाराच्या शोधात बारामती तालुक्यातील सोमेश्वर येथे आलं. सुरुवातीला वडिलांनी सोमेश्वर कारखान्यात साखरेची पोती उचलण्याचं काम केलं. मात्र काही वर्षांनंतर त्यांना काम करत असताना उंचावरून मारलेल्या उडीमुळे कमरेला मार बसला, म्हणून ते काम सोडावं लागलं. हातावरचं पोट असल्यानं काहीतरी करणं भागच होतं. म्हणून मग ऊसतोडणी चालू केली (अजूनही करतात). झालं! पत्र्याच्या खोलीतला संसार पाचटाच्या झोपडीत सुरू झाला.

माझी आई खूप कष्टाळू आहे. ती आम्हाला भावंडांना नेहमी म्हणायची, ‘आपण गरीब आहोत. त्यामुळे कामपण करायचं अन साळापण शिकायची.’ तिचे हे शब्द म्हणजे ‘कमवा आणि शिका’ हा मंत्रच होता.

तिला नेहमी वाटे, की मुलांनी चांगलं शिकलं पाहिजे. साधारणपणे गरीब, अशिक्षित लोकांना असं वाटतं, की त्यांच्या मुलांनी कमाई करावी म्हणजे घर चालवायला पैसे होतील; पण ते पैसे किती दिवस आणि कितपत पुरतील हे नीटसे लक्षात येत नाही.

आम्ही दोघं भाऊ मात्र एकीकडे काम करत होतो तर दुसरीकडे शिक्षणही घेत होतो. मला आठवतं, मी चौथीत असताना आम्ही एक सायकल विकत घेतली होती. त्याच वेळी माझ्या खऱ्या प्रवासाला सुरुवात झाली. पहाटे ३ वाजता उठायचं, सायकल बैलगाडीत बांधायची आणि फडात जायचं. साधारण ८ वाजेपर्यंत ऊस तोडायचा. त्यानंतर कोपीवर येऊन सर्व आवरून १०.३० ची शाळा गाठायची. अगदी दहावीपर्यंत माझी हीच दिनचर्या चालू होती.

इयत्ता चौथीपर्यंत मी वर्गात सतत पहिला येत गेलो. अभ्यासात हुशार होतोच पण विविध कार्यक्रमांमध्ये भाषणही करायचो. याच कारणामुळे चौथीत असताना मला शाळेत उपमुख्यमंत्री बनवलं होतं.

पाचवीत गेल्यावर मात्र शाळा बदलली. प्राथमिक शाळेतून हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. शाळेत मुलांची संख्या वाढली. शाळेचा खर्च मात्र फारसा नव्हता. वर्षाची २०० रुपये फी, दुपारी पोटभर भात मिळायचा, गरीब आणि गुणवंत म्हणून वर्षातून किमान एक तरी शालेय गणवेश मोफत मिळायचा. थोडा मोठा झालो, तसा केटरिंगच्या कामाला जायला लागलो. त्यामुळे अधूनमधून शाळा बुडायची.

शाळा बुडवून मित्रांच्या संगतीनं पोहायला जाणं, गोट्या खेळणं, विटी-दांडू खेळणं इ. कारणांसाठीसुद्धा शाळा बुडत होती. पण इतर वेळी जेव्हा केव्हा शाळेत जाईन तेव्हा मात्र पूर्ण लक्ष शिक्षकांच्या शिकवण्याकडे असायचं. मात्र आता शाळा बुडत असल्याकारणानं वर्गात पहिला नंबर येत नव्हता; तरी दुसरा, तिसरा यायचाच. पाचवीपासून दहावीपर्यंत वर्गातला सर्वात हुशार मुलगा माझ्या शेजारी बसायचा. त्याचाही मला भरपूर फायदा व्हायचा. ज्या दिवशी माझी शाळा बुडायची त्याच्या दुसऱ्या दिवशी मी माझ्या मित्रांना आदल्या दिवशी काय काय झालं ते विचारून कव्हर करून घ्यायचो.

घरची परिस्थिती सुरुवातीपासूनच बेताची होती. त्यात वडील दारू पिऊन भांडणं करायचे, मारामाऱ्या व्हायच्या. त्याचा आमच्यावर विपरीत परिणाम व्हायचा. पावसाळ्यात सर्व बाजूंनी कोपीत पाणी यायचं. त्यामुळे सर्व पसारा गोळा करून कोपीच्या मध्यभागी मांडावा लागायचा. पावसाच्या भीतीपोटी घरापासून लांब खेळायला जाऊन जमत नव्हतं. पाऊस आला की कोपीतलं सामान ओलं होण्याची चिंता वाटून पाय कोपीकडे धाव घ्यायचे. अजूनही पाऊस आला, की सैरभर झाल्यासारखं वाटून मनात अस्थिरता दाटून येते.

बघता बघता नववी पास झालो. नववीला जेमतेम मार्क्स

पडले; खूप जास्त नाही आणि खूप कमीपण नाही. दहावीत प्रवेश घेतला. दहावी असूनसुद्धा शाळेत लक्ष लागत नव्हतं. संपूर्ण वर्षभरात जेमतेम ५०-६०% उपस्थिती लागली असेल. बाकीचा वेळ केटरिंगच्या कामाला जाणं, कुस्ती खेळणं यातच जात होता. घरी अभ्यासपण सुरू नव्हता. बघता बघता डिसेंबर संपला तेव्हा जाग आली, की मार्चमध्ये बोर्डाची परीक्षा आहे. एकीकडे मोठा भाऊ तर दुसरीकडे शाळेतील शिक्षक मार्कांचं महत्त्व पटवून देत होते.

आता मात्र काहीतरी केलं पाहिजे असं तीव्रतेनं वाटायला लागलं. पुन्हा एकदा दोन दिवस केटरिंगच्या कामाला जाऊन ४०० रु. मिळवले. ते घेऊन थेट विवेकानंद अभ्यासिकेत जाऊन ॲडमिशन करून आलो. आईवडिलांना सांगून थोड्या दिवसांसाठी ऊसतोडणी बंद केली; मात्र तुम्ही ऊसतोडणीला जाताना मला उठवून जात जा अशी त्यांना विनंती केली. ठरल्यानुसार ते रोज मला पहाटे उठवून जात. मग मी पहाटे ४ वाजता अभ्यासिकेत जाऊन अभ्यास करत बसे. परीक्षेला जेमतेम दोन महिने उरले होते. त्यानुसार 'स्मार्ट स्टडी' करणं गरजेचं होतं. मग शाळेचं वेळापत्रक पाहून महत्त्वाच्या तासाच्या दिवशीच शाळेत जाई. इतर सारा वेळ अभ्यासिकेत अभ्यास करत बसे. मागील वर्षाच्या प्रश्नपत्रिका मिळाल्या. त्यांचं वर्गीकरण केलं. 'बेस्ट ऑफ फाईव'चा विषय 'सेट' केला. त्या विषयाचा वेळ दुसऱ्या विषयासाठी वापरला. असा दोन-तीन महिने पहाटे ४ ते रात्री ११-११.३० पर्यंत सातत्यानं अभ्यास केला.

अत्यंत सावध आणि सजगपणे पेपर दिले आणि सुट्ट्यांमध्ये आईसोबत टोमॅटोची कॅरेटस् उचलण्याच्या कामाला जाऊ लागलो. सुट्टीचा एक-एक दिवस जात होता आणि निकालाचा एक-एक दिवस जवळ येत होता.

अगदी निकालाच्या दिवशीसुद्धा कामाला गेलो. मला स्वत:ला तर निकाल बघता येणार नव्हता कारण माझ्याकडे बटणांचा साधा फोन होता. त्याच दिवशी दुपारी १ च्या सुमारास मित्राचा फोन आला. मला ९१.२०% एवढे मार्क्स पडल्याचं त्यानं सांगितलं. चांगले मार्क्स पडतील असं वाटलं होतं पण एवढे चांगले पडतील असं वाटलं नव्हतं. असं म्हणतात ना 'देनेवाला जब भी देता है, छप्पर फाडके देता है।' हे अगदी तंतोतंत खरं ठरलं.

किती मार्क्स पडले हे आईला सांगून कळणार नव्हतं. म्हणून तिला फक्त एवढंच म्हणलं, ''अग मम्मे, लय मार्क पडले!'' आणि त्याच क्षणी आम्हा दोघांच्याही डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. आत्तापर्यंत घेतलेल्या कष्टाचं चीज झालं या भावनेनं तिचा चेहरा सुखावला होता.

आमच्यासोबत आसपासच्या परिसरातील सर्वांना आनंद झाला. सगळीकडून कौतुकाचा वर्षात होत होता. मी मात्र मित्रांसोबत खेळत बसलो होतो. तेवढ्यात आमच्या वर्गशिक्षिका पिसाळ मॅडम रस्त्यानं जात असताना त्यांची नजर माझ्यावर पडली. त्या नुकत्याच मार्क्स मांडून येत होत्या. त्यांनी मला आवाज दिला. मी त्यांच्याजवळ गेलो, त्यांच्या पाया पडलो. 'तू वर्गात पहिला आला आहेस, तसेच सर्व मुलांमध्येसुद्धा तूच पहिला आला आहेस' असं त्या म्हणाल्या. त्यांना माझ्या परिस्थितीची, मी घेत असलेल्या कष्टांची पुरेपूर जाणीव होती. त्यांनी माझं कौतुक केलं आणि मला पेढ्यांसाठी म्हणून शंभर रुपये दिले.

आशा प्रकल्पातले चाचर सर सुरुवातीपासूनच माझ्या संपर्कात होते. त्यांना ही बातमी समजली. त्यांनीही माझं कौतुक केलं. आशा फाउंडेशनच्या (टाटा ट्रस्ट) वतीनं शंभराहून अधिक व्यक्तींचे वेगवेगळ्या भागांतून फोन आले, त्यांनीही माझं अभिनंदन केलं. काही दिवसांनी समिक्षाताई आणि हेमंतदादा गायकवाड (सरपंच, वाघळवाडी ग्रामपंचायत) हे दोघं जण कोपीवर आले. त्यांनी माझी मुलाखत घेऊन माझं नाव महाराष्ट्र टाईम्सकडे सुचवलं.

महाराष्ट्र टाईम्स गेली ११ वर्षं पुण्यातल्या ९०%पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या पण हलाखीची आर्थिक परिस्थिती असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन, त्यांची मुलाखत घेऊन निवड करत असते. हा उपक्रम पुण्यासह मुंबईमध्येपण राबवला जातो. यामध्ये पुण्यातून जवळपास १५ ते १७ विद्यार्थी दरवर्षी निवडले जातात आणि त्यांचं संपूर्ण शिक्षण होईल एवढी शिष्यवृत्ती प्रत्येकाला दिली जाते.

माझी यासाठी निवड झाल्याचं मला काही दिवसात समजलं. महिनाभर माझ्या फोटोसोबत माझी बातमीही महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रसिद्ध केली जात होती. काही दिवसांनी पुण्यातील स.प. महाविद्यालयात पुणेकरांच्या साक्षीनं शिष्यवृत्ती-वाटपाचा कार्यक्रम पार पडला. अशा प्रकारे प्रत्येकाला पुढील शिक्षणासाठी दार खुलं करून दिलं गेलं.

पुढील शिक्षणासाठी शासकीय तंत्रनिकेतन पुणे येथे माझा नंबर लागला. तो तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून पुढे मी इंजिनिअरिंगला प्रवेश घेतला आणि आता जोमानं अभ्यास करत इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षाला शिकत आहे. प्रवास अजूनही संपलेला नाही. परंतु काल जिथे होतो त्यापेक्षा आज दोन पावलं पुढे आहे याचं समाधान उराशी बाळगून पुढील प्रवासासाठी सज्ज असतो.

सोमनाथ रावसाहेब रंदवे
somnathrandave067@gmail.com





अशोक हातागळे

घरात शिक्षणाचा कसलाही गंध नाही, उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. मिळेल ते काम करून आईवडील कसे तरी कुटुंबाचा गाडा ओढत होते. वडिलांना सुतारकाम जमायचं; पण गावाकडे 'बलुते' पद्धत होती. वर्षभर काम केल्यावर शेवटी कामाच्या बदल्यात ज्वारी भेटायची. त्यात वडील दारू प्यायचे. कामाच्या बदल्यात वर्षानंतर मिळणाऱ्या धान्याच्या बदल्यात अगोदरच दारू पिऊन उधारी व्हायची. त्यामुळे आईवर घराचा प्रचंड ताण यायचा.

या सगळ्या प्रश्नांवर माझ्या आईवडिलांना ऊसतोडणी हा पर्याय दिसू लागला. कारण ऊसतोडीला जायच्या अगोदर पैसे मिळायचे. मोठी रक्कम एकत्र मिळायची. यातून घरातील थोड्याफार अडचणी सुटायच्या. माझ्या जन्माअगोदरपासून आईवडील ऊसतोडीला जायचे. मी एक महिन्याचा असतानाच मला ऊसतोडीला घेऊन गेल्याचे आई सांगते. आईवडील दोघेच असल्यामुळे मला सांभाळायला कोणीच नव्हते. उसाच्या फडात पाचटाची (कोप) सावली करून त्या सावलीत मला टाकून दोघे काम करायचे.

माझे बालपण ऊसतोडीमध्येच गेले. गावात आल्यावर कधीतरीच मी अंगणवाडीत जायचो, नाही तर आईच खाऊ घेऊन यायची. घरात शिक्षणाचा कोणालाच गंध नव्हता. त्यामुळे मी शाळेत गेले पाहिजे असे कोणाच्या डोक्यातही येत नसे. माझे मामा बळीराम नाडे हे मात्र शिक्षण घेत होते. म्हणून माझ्या आईला वाटायचे की मी शिकावे. त्यामुळे आईच्या आग्रहास्तव माझे पहिलीला शाळेत नाव टाकले आणि मी अधूनमधून शाळेत जायला सुरुवात केली. ऊसतोडीनंतर वडील सुतारकामदेखील करायचे. वडिलांना वाटायचे मी शाळा शिकण्यापेक्षा सुतारकाम शिकून पुढे सुतारकी करावी, कारण माझे आजोबादेखील सुतारकाम करायचे. मलाही शाळेपेक्षा लाकूड तासणे बरे वाटायचे.

दरवर्षी दिवाळी जवळ येताच घरात सामानाची बांधाबांध सुरू व्हायची. आई पेटीत एक-एक सामान भरायची. मसाला, चटण्या, किराणा; पुढे ६ महिने पुरेल असे बरेच साहित्य त्यात असायचे. ते बघून मीदेखील माझी पाटी, पुस्तके बाजारच्या एका पिशवीत भरायला लागायचो.

ऊसतोडीला कोयते घेऊन जायला मोठा ट्रक यायचा. शाळेच्या समोरच्या मैदानातच ट्रक उभा राहायचा. मोठी माणसे ट्रकमध्ये धान्य, पेट्या, चुलीसाठी लागणारे सरपण भरायची. अशा एक-दोन गाड्या रोज जायच्या तशी आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्यादेखील कमी व्हायची. जाण्याची ही सर्व लगबग मी शाळेतून कुतूहलाने पाहायचो. एक दिवस आमची ट्रक आली आणि आमची अशीच निघायची लगबग सुरू झाली. मला शाळेची थोडीफार गोडी लागायला सुरुवात झाली होती, त्याच वेळेस शाळा सोडून मला ऊसतोडीला जावे लागले.

ऊसतोड हे प्रचंड कष्टाचे काम आहे. आई म्हणायची या कामापेक्षा मेलेले बरे, कारण रोज पहाटे ४ वाजता उठावे लागायचे, अंधारात सर्व स्वयंपाक करून ६ वाजता ऊस तोडायला फडात जावे लागायचे. उसाच्या पाचटाने अंग कापायचे. त्याचा उन्हात प्रचंड त्रास व्हायचा. रात्री बारा-एक वाजता उसाची गाडी भरायला जावे लागायचे. राहण्याचा, पाण्याचा, लाईटचा काही ठिकाणाच नसायचा.

ऊसतोड करत करत माझी तिसरीपर्यंत शाळा झाली होती; पण बाकी मुलांच्या तुलनेत मी अभ्यासात जरा मागेच होतो. कारण ऊसतोडीला गेल्यावर तिकडे ६ महिने शाळा बंदच असायची. गावाकडे आल्यावर परत शाळेत जायचो. यामुळे मी वर्गाने पुढे जायचो पण अभ्यासाने मागेच असायचो. पुढे वडिलांनी गावात सुतारकाम सुरू केले. आमची ऊसतोड बंद झाली आणि माझी शाळा सुरू झाली.

आजही माझे ९०% नातेवाईक ऊसतोडीला जातात. त्यांची मुलेदेखील शाळा सोडून त्यांच्याबरोबर जातात. त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न अजूनही माझ्या डोळ्यासमोर उभा आहे.

बीड जिल्ह्यातून दरवर्षी ३ लाख कुटुंबे ऊसतोडीसाठी आपल्या मुलांसोबत स्थलांतरित होतात. मी ऊसतोडीच्या सर्व अनुभवांतून गेलेलो असल्यामुळे आम्हाला ऊसतोड करणाऱ्या कुटुंबांचे प्रश्न माहीत आहेत आणि म्हणूनच मुलांचे शिक्षण थांबू

नये यासाठी ‘ग्रामऊर्जा’च्या माध्यमातून काय करता येईल हेही लक्षात येते आहे. यामुळे आम्हाला काम करायला सोपे जातेय.

गावात मी पाचवीपर्यंतचं शिक्षण पूर्ण केलं. तेव्हा आमच्या जिल्हा परिषदेच्या शाळेवर जगताप सर हे शिक्षक होते. ते गावातच राहायचे. त्यांनी माझा खूप अभ्यास करून घेतला. आईवडिलांना सांगितले, मुलगा हुशार आहे, त्याला चांगले शिकू द्या. माझे मामा बळीराम नाडे हेही माझ्या आईवडिलांच्या खूप मागे होते, ‘अशोकला मी बीडला जिल्ह्याच्या ठिकाणी शिकायला घेऊन जातो’ म्हणून. पण वडिलांना ते बरीच वर्षे मान्य नव्हते. त्यांना मला त्यांच्यासारखे सुतार करायचे होते. शेवटी मी सहावीला असताना मला जिल्ह्याच्या ठिकाणी पाठवायला वडील तयार झाले. मामानी मला बीडला एका वसतिगृहात टाकले. शिकण्याचा आत्मविश्वास मामानी दिला आणि इथून माझ्या शिक्षणाचा प्रवास सुरू झाला. ऊसतोड आणि घरातील असंख्य प्रश्न यांतून मी मामाच्या मदतीमुळेच बाहेर पडू शकलो. कारण गावात शाळा पाचवीपर्यंतच होती. घरची आर्थिक परिस्थिती नव्हती. मामामुळे शिक्षणाची प्रेरणा मिळाली. माझा अकरावीपर्यंतचा शिक्षणाचा सगळा खर्च मामांनीच केला.

अकरावीनंतर एका दवाखान्यात अर्धवेळ नोकरी करून मी माझे शिक्षण पूर्ण केले. मामा सामाजिक क्षेत्रात असल्यामुळे ते मला नेहमी वेगवेगळ्या कार्यशाळांना घेऊन जायचे. त्यातून खूप गोष्टी कळायच्या. त्या अनुभवामुळे मला पुण्यात एका सामाजिक संस्थेत नोकरी मिळाली. दवाखान्याचे काम सोडून पाच वर्षे या सामाजिक संस्थेमध्ये काम केले. त्या अनुभवावरून आणि मामाच्या मार्गदर्शनाने मी तुळजापूरच्या टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतून एमएसडब्ल्यूचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. हे शिक्षण घेत असताना माझी जीवनसाथी प्रेरणा शिलवंत हिने मला खूप मोठा आर्थिक आणि मानसिक आधार दिला आणि तिथून माझ्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले.

मी शिकल्यामुळे माझ्या गावातील मुले माझ्याकडे आता ‘रोल मॉडेल’ म्हणून पाहतात. गावातील ऊसतोड–कुटुंबांनादेखील आता वाटायला लागलेय, की आपली मुलेपण अशोकसारखे शिकून आपल्या कुटुंबाला या ऊसतोडणीमधून मुक्त करू शकतील. माझ्या अशिक्षित आईबापाला आता गावात माझ्या शिक्षणामुळे सन्मान मिळायला लागला आहे; त्याचा त्यांनादेखील अभिमान वाटतोय.

शिक्षण पूर्ण होऊन एक–दोन नोकऱ्या केल्या; पण एक खंत कायम माझ्या मनात होती. माझे शिक्षण सुरू असल्यामुळे मोठ्या बहिणीला मी शिक्षणासाठी मदत करू शकलो नाही. ती आजही ऊसतोडीचेच काम करतेय. मात्र थोडा प्रयत्न करून मी छोट्या बहिणीला एम.ए.पर्यंत शिकवू शकलो. आपल्या भागातल्या इतर असंख्य मित्र–मैत्रिणींच्या या प्रश्नावर काम करावे असे नेहमी मनात यायचे. समाजकार्याचे शिक्षण घेतल्यापासून ऊसतोड–मजुरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचे माझे स्वप्न होते. आज ग्रामऊर्जा फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही पिढ्यान्‌पिढ्या ऊसतोडीच्या जाळ्यात अडकलेल्या कुटुंबांसाठी रचनात्मक व शाश्वत शिक्षणाचे काम उभे करून यातून बाहेर निघण्याचा मार्ग दाखवू इच्छितो.

अशोक हातागळे
ashoksocial8@gmail.com



ग्रामऊर्जा फाउंडेशन

ग्रामविकासासाठी इच्छुक असलेल्या अनुभवी युवकांनी एकत्र येऊन बीड येथे ‘ग्रामऊर्जा’ चळवळ सुरू केली. साधारण २०१७ सालापासून मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमांतर्गत मराठवाड्यातल्या गावांमध्ये घेतलेल्या अनुभवातून काही युवकांची बीड भागातली बेरोजगारी, गरिबी, मुलांचे शिक्षण, आरोग्य इत्यादी प्रश्नांबाबतची समज पक्की होत गेली. २०२० पासून मराठवाड्यातल्या गावांमध्ये पूर्ण वेळ राहून, तिथल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या उद्देशाने ग्रामऊर्जेच्या कामाला सुरुवात झाली.

आपल्या मुलांनी चांगले शिकावे, आपले नाव मोठे करावे, आपल्यासारखा ऊस तोडू नये अशी प्रत्येक पालकाची इच्छा असते. परंतु त्यात अशिक्षितपणा, व्यसने, रोजगार, बालविवाह अशा अनेक अडचणी असतात. अशा परिस्थितीतही मुलांचे शिक्षण पुढे चालू राहावे, मुलांना आनंदाने शिकायला मिळावे, अर्थपूर्ण शिक्षण मिळावे यासाठी ग्रामऊर्जा टीम प्रयत्न करत आहे.

२०२१ पासून ग्रामऊर्जेने जिल्हा परिषद शाळांसोबतचे काम अधिक जोमाने सुरू केले आहे. ‘ग्रामहुनर’ कार्यक्रमातून मुलांच्या गणित, भाषा, जीवनकौशल्ये यातील मूलभूत संकल्पनांवर काम करणे, मुलांचा पाया पक्का करणे आणि यातून त्यांचे पुढचे शिक्षण व आयुष्य सुकर व्हावे यासाठी आठ गावांतील शाळांबरोबर काम चालू आहे. यात स्थलांतरित मुलांचे प्रश्न, शाळा-सुधार, गुणवत्ता-सुधार याबाबतची जबाबदारी फक्त संस्थेची किंवा शासनाची नसून गावाने, पालकांनी, शाळा व्यवस्थापन समितीनेदेखील ही जबाबदारी घ्यावी व यातून ग्रामीण भागात शाश्वत शैक्षणिक चळवळ उभी राहून प्रत्येक मुलापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोचावे हे ग्रामऊर्जाचे ध्येय आहे.

सध्या २० गावांमध्ये ‘टॉयबँक’ या प्रकल्पाच्या माध्यमातून २१ जिल्हा परिषद शाळांना वयोगटानुसार खेळण्यांचे वाटप केले आहे. ही खेळणी मुलांच्या गणित, भाषा या विषयांच्या अभ्यासाला पूरक तर आहेतच पण त्याचबरोबर मुलांमध्ये एकाग्रता, व्यवस्थापन कौशल्य वाढीस लागावे यासाठीसुद्धा साहाय्यभूत आहेत.

ग्रामऊर्जाच्या ‘वर्ग-वाचनालय’ प्रकल्पांतर्गत १७ शाळांना वाचन साहित्य देण्यात आले आहे. वाचनपातळी स्तर एक ते चारनुसार मुलांना अक्षर-ओळख व्हावी, त्यांना अवांतर वाचनाची सवय लागावी हा उद्देश आहे.

‘डिजिटल-क्लासरूम’ या प्रकल्पांतर्गत गावातच शिकवणी वर्ग घेतले जातात. यात इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान, इंग्रजी असे अवघड वाटणारे विषय, सामाजिक भान असणारे स्वयंसेवक इंटरनेटच्या माध्यमातून शिकवतात. आपापल्या नोकऱ्या सांभाळून हे युवक हे काम करतात. हा प्रकल्प सध्या तीन गावांमध्ये चालू आहे.

यासाठी ग्रामऊर्जेला शाळांसोबत काम करणाऱ्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांची गरज भासली. यातून वर्ष २०२२ पासून ‘ग्रामहुनर फेलोशिप कार्यक्रमा’ला सुरुवात केली. हे फेलो ग्रामऊर्जाने निवडलेले सुशिक्षित युवक-युवती असून, मुख्यतः याच भागात राहणारे आहेत. त्यांना स्थानिक प्रश्नांची जाण आहे आणि विशेष म्हणजे शैक्षणिक प्रश्नावर काम करण्याची आवड आहे. योग्य मार्गदर्शन, दिशादर्शनातून ते शाळांसोबत जोडले गेले आहेत. मुलांना शिकवण्याबरोबरच शैक्षणिक व सामाजिक भान असलेली पिढी इथले स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी उभी राहावी असा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. सद्यस्थितीत आठ शाळांसोबत हा फेलोशिप प्रकल्प चालू असून शिक्षक, शासन, पालक आणि गाव यांच्या सहभागातून ग्रामीण भागातील हुनर जागवून ग्रामऊर्जा आपली चळवळ उभी करत आहे.

दादासाहेब गायकवाड, अशोक हातागळे,
दत्तात्रय शिंगाडे आणि वैजनाथ इंगोळे

आदरांजली

बीड जिल्ह्यातील डोमरी येथील सोनदरा गुरुकुलचे सुदामकाका भोंडवे, त्यांच्या पत्नी सिंधुताई, सून कार्तिकी व नात आनंदी ह्यांचे दि. २२ फेब्रुवारी २०२३ रोजी अपघाती निधन झाले. पालकनीती परिवाराकडून त्यांना विनम्र आदरांजली. सुदामकाकांचा मुलगा म्हणजे गुरुकुलाचे काम बघणारे अश्विन तेवढे या अपघातातून वाचले. त्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

“२०१५ ते २०१८ या तीन वर्षांत कामानिमित्त बरेचदा गुरुकुलात जाणं झालं. गुरुकुल म्हणजे बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी १९८६ साली सुरू झालेली सोनदरा गुरुकुल ही निवासी शाळा. गुरुकुलात जाणं म्हणजे माझ्यासाठी एक पर्वणीच असायची. कामासोबतच सुदामकाकांशी बोलणं ही तिथे जाण्यासाठीची महत्त्वाची प्रेरणा! गुरुकुलात प्रवेश केल्या-केल्या ओसंडून वाहणारं प्रेम, आनंद, तिथलं आध्यात्मिक वातावरण पदोपदी जाणवायचं. कितीही रात्री गुरुकुलात पोचलं तरी ‘पोरंहो किती उशीर केला, जेवून घ्या आता’ म्हणून भाकरी, भाजी, ठेचा आणि सिंधूमामींच्या मायेच्या शब्दांनी पोट तुडुंब भरायचं. सिंधूमामी म्हणजे गुरुकुलातली अन्नपूर्णाच! प्रत्येक भेटीत काका आम्हाला म्हणायचे, ‘‘तुमच्यासारखी तरुण मंडळी गुरुकुलात आली की मला खूप छान वाटतं, तुमच्याशी संवाद साधताना नवीन काहीतरी गवसतं.’’ त्यांचं एक वाक्य माझ्या खूप पक्कं लक्षात राहिलंय. ते म्हणाले होते, ‘‘बरेचदा कामाच्या गराड्यात आपल्या आतला प्रवास करायचा राहून जातो, त्याचीही आपण तेवढीच मशागत करायला हवी. तो प्रवास आपल्याला बाहेरचा गराडा सांभाळण्याची ताकद देतो.’’

गेल्या आठवड्यात अचानक गुरुकुलात जाण्याची वेळ आली. यावेळी मात्र गुरुकुलात ‘पोरंहो किती उशीर केला, जेवून घ्या आता’ हे तर कानावर आलं नाही, सुदामकाकांचं ते हास्यही कुठेतरी विरून गेलं होतं. एक भकासपणा गुरुकुलात जाणवत राहिला. गुरुकुलाची झालेली एवढी मोठ्ठी हानी कधीही भरून न निघणारी आहे.”

१९८६ साली ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी बीड जिल्यातील पाटोदा तालुक्यात दीनदयाळ नवरचना प्रतिष्ठान अंतर्गत सोनदरा गुरुकुलाची (निवासी शाळा) स्थापना झाली. गुरुकुलाच्या कामासाठी सुदाम भोंडवे आणि त्यांच्या पत्नी सिधू भोंडवे यांनी त्यांचं संपूर्ण आयुष्य झोकून दिलं होतं. अगदी तीन झोपड्यांत आणि थोड्याच मुलांसोबत सुरू झालेल्या गुरुकुलाची डोंगरांच्या कुशीत आज एक खूप सुंदर वास्तू असून २०० मुलं आज तिथे शिकत आहेत. या सगळ्याच्यामागे काकांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची अफाट मेहनत आहे. गुरुकुलातील शिक्षण हे नीती आणि मूल्याधारित असावं याबाबत ते सतत प्रयत्नशील असायचे.

प्रणाली सिसोदिया

फॉर्म ४ वृत्तपत्र अधिनियम क्र. ८ प्रमाणे द्यावयाची माहिती

वृत्तपत्राचे नाव – पालकनीती

प्रसिद्धीकाल – मासिक

प्रकाशनस्थळ – अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वे रस्ता, पुणे – ४११००४

प्रकाशकाचे नाव – डॉ. संजीवनी कुलकर्णी

राष्ट्रीयत्व – भारतीय

पत्ता – अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वे रस्ता, पुणे – ४११००४

मुद्रकाचे नाव – डॉ. संजीवनी कुलकर्णी

राष्ट्रीयत्व – भारतीय

पत्ता – अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वे रस्ता, पुणे – ४११००४

संपादकाचे नाव – डॉ. संजीवनी कुलकर्णी

राष्ट्रीयत्व – भारतीय

पत्ता – अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वे रस्ता, पुणे – ४११००४

मुद्रणस्थळ – जय ॲड्व्हर्टायझिंग, सी – १०२, सुनिता अपार्टमेंट, कसबा पेठ, पुणे – ४११०११

पालकनीती परिवार (सार्वजनिक विश्वस्त निधी) चे विश्वस्त–

१) डॉ. संजीवनी कुलकर्णी – अमृता क्लिनिक, कर्वे रोड, पुणे – ४
२) डॉ. विनय कुलकर्णी – ४, अश्लेषा अपार्टमेंटस्, डेक्कन जिमखाना, पुणे – ४
३) नीलिमा सहस्रबुद्धे – ७, अनुप्रिता अ’, गल्ली नं. ९, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे–३८
४) शुभदा जोशी – गुरुप्रसाद अपार्टमेंट, २३, आनंदनिकेतन सोसा., कर्वेनगर, पुणे – ५२
५) वंदना कुलकर्णी – स्वोजस, सहवास सोसा., कर्वेनगर, पुणे – ५२
६) रमाकांत धनोकर – सी, ३०१, सुनिता अपार्टमेंट, १४१७, कसबा पेठ, पुणे – ११
७) प्रियंवदा बारभाई – अ–३, रोहन तपोवन, मेंढी फार्मजवळ, गोखलेनगर, पुणे – १६

मी डॉ. संजीवनी कुलकर्णी असे जाहीर करते, की वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.

तारीख ०१/०३/२०२३

डॉ. संजीवनी कुलकर्णी

प्रकाशक

Publication Date - 15.03.2023
Posting Date - 16.03.2023
Posted at BPC Vishrambagwada, Pune CSO, Pune - 411030

Registered

RNI No. MAHMAR/2001/4166
Postal Registered No.
PCW / 026 / 2021-2023



मितवा

लेखन – कमला भसीन
चित्रे – शिवांगी
एकलव्य प्रकाशन

नुकतीच एका मैत्रिणीची फेसबुक पोस्ट वाचनात आली. ‘बाया–मान्सांनी’ काय करावे आणि काय करू नये याबद्दल तिला मिळालेले सल्ले तिने त्यात नमूद केलेले होते. उशिरापर्यंत घराबाहेर राहू नये, कामं गपगुमान करावी, ‘लंकेच्या पार्वती’सारखे भुंडे गळे, हात, कपाळ घेऊन फिरू नये अशा अनेक सल्ल्यांची तिने यादीच केली होती. मला आठवते, लहान असताना घराबाहेर असे सल्ले आम्हा बहिणींना अगदी हमखास मिळायचे. अशा सल्ल्यांकडे दुर्लक्ष कसे करायचे, वेळप्रसंगी समर्पक उत्तर द्यायचे हे आता समजले असले, तरी लहान वयात या सल्ल्यांचा मनावर खोल परिणाम व्हायचा. ते ऐकले जायचे, योग्य वाटले नाहीत तरी स्वतःच्या वागण्याबद्दल मन साशंक व्हायचे. याबद्दल मोकळा संवाद करण्याच्या जागा आमच्याजवळ नव्हत्या.

कमला भसीन यांचे ‘मितवा’ हे पुस्तक वाचताना मला ही संवादाची जागा सापडल्यासारखी वाटली. ‘मितवा’ची कथा पंजाबमधल्या छोट्या खेडेगावात घडते. मितवा एका सुखवस्तू शेतकरी घरातली, दोन भावांच्या पाठीवरची मुलगी आहे. मुलीच्या रूपात आपल्याला सखी मिळाली म्हणून आईने तिचे नाव ‘मितवा’ ठेवले आहे. वरवर सुखी भासणाऱ्या या कुटुंबातल्या स्त्रिया मात्र दबलेल्या आहेत. वडिलांच्या खांद्याला खांदा लावून शेतात काम करूनही आईची घरातली कामे कमी होत नाहीत. भावांप्रमाणे मितवाला बाहेर फिरण्याचे, खेळण्याचे, सायकल चालवण्याचे स्वातंत्र्य नाही. वडिलांच्या हुकूमशाहीपुढे घरातल्या स्त्रियांचे काही चालत नाही. मात्र दोघींना एकमेकींचा आधार आहे. अशात एक दिवस वडील आजारी पडतात. घरात इतर कोणीही मदतीला नसते. अशा वेळी वडिलांचे म्हणणे न ऐकल्यामुळेच मितवा त्यांचा जीव वाचवू शकते!

गोष्ट अगदी सरळ आहे. खरे सांगायचे, तर फार रंजक म्हणावी अशीही नाही. चित्रेसुद्धा थेट, साधी–सोपी आहेत. मात्र त्या साधेपणात सर्वांच्या अनुभवाशी घट्ट जोडलेला धागा आहे – तो म्हणजे लहान लहान प्रसंगांतून दिसून येणारा स्त्री–पुरुष भेदभाव. बायको घरातली, शेतातली सगळी कामे करते, तरी तिला नवऱ्याकडून मानाची वागणूक मिळत नाही. घरातल्या मुलग्यांना बाहेर फिरायचे स्वातंत्र्य आहे; मुलींना नाही. मुलींना सायकल, ट्रॅक्टर चालवण्याची परवानगी नाही. स्त्री–भ्रूणहत्येचाही कथेत उल्लेख आहे.

मुलांशी स्त्री–पुरुष समानतेबद्दल बोलण्याची जागा हे पुस्तक तयार करते. आपल्याला स्त्री–पुरुष भेदभाव कुठल्या रूपात दिसतो, आपल्याकडून कळतनकळत असा भेदभाव होतो का, त्याबद्दल काय करावे, अशी चर्चा हे पुस्तक वाचताना मुलांबरोबर करता येईल. घरकामांमध्ये दिसणारी स्त्री–पुरुष विभागणी, त्यामुळे मुलांच्या मनात तयार होणारे लिंगाधारित साचे यावरही संवाद सुरू करता येईल.

आईने मुलीचे ठेवलेले ‘मितवा’ हे नाव बोलके आहे. मितवाची गोष्ट वाचताना कमला भसीन यांच्याच एका कवितेच्या काही ओळी आठवल्या –

हवाओं सी बन रही हैं लड़कियां
उन्हें बेहिचक चलने में मजा आता है
उन्हें मंजूर नहीं बेवजह रोका जाना
फूलों सी बन रही हैं लड़कियां
उन्हें महकने में मजा आता है
उन्हें मंजूर नहीं बेदर्दी से कुचला जाना…

मानसी महाजन
manaseepm@gmail.com

‘पालकनीती’ हे मासिक मालक, पालकनीती परिवाराकरिता प्रकाशक व मुद्रक डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी जय ॲड्व्हर्टायझिंग, सी-१०२, सुनिता अपार्टमेंट, कसबा पेठ, पुणे - ४११०११ येथे छापून अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वेरस्ता, पुणे - ४११००४ येथून प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. संजीवनी कुलकर्णी
'PALAKNEETI' monthly is owned by Palakneeti Pariwar, Printed and Published by Dr. Sanjeevani Kulkarni, Printed at Jay Advertising, C – 102, Sunita Apartment, Kasba Peth, Pune – 411011 & Published at Amrita Clinic, Sambhaji Bridge Corner, near Panchaleshwar Mandir, Karve Road, Pune – 411004.
Editor – Dr. Sanjeevani Kulkarni